
छात्र

# प्रबोधन

सौर अश्विन शके १९१९
वर्ष ६ अंक ३




ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक!

# संयोजक प्रशिक्षण शिबिर

ज्ञान प्रबोधिनीचे विविध शैक्षणिक प्रयोग अनौपचारिक माध्यमातून व स्वयंसेवी वृत्तीने आपल्या गावी सुरू करण्याची इच्छा असलेल्या २० वर्षीय व पुढील युवक-युवती-पालक-शिक्षक यांच्यासाठी हे शिबिर आयोजित केले आहे.

या शिबिरामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन कसे करावे? याचे मार्गदर्शन केले जाईल. तसेच त्यासाठी लागणाऱ्या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल.

ज्ञान प्रबोधिनीचे विविध शैक्षणिक प्रयोग, त्यामागील संकल्पना, ध्येय, विचार व येथे काम करणाऱ्या व्यक्ती यांचा परिचय या शिबिरात होईल.

या शिबिरातून प्रशिक्षण घेतल्यानंतर आपापल्या गावी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनासाठीचे उपक्रम राबविण्यासाठी आठवड्यातून किमान ३ तास वेळ स्वयंसेवी वृत्तीने व उत्स्फूर्तपणे द्यावा अशी अपेक्षा आहे.

**स्थळ :** पुणे परिसर, **कालावधी :** २४ ते २८ डिसेंबर १९९७,

**शुल्क :** रु. १५०/- (शिबिरकाळातील निवासभोजन खर्चासह)

शिबिर निवासी असणार असून शिबिरात पूर्णवेळ व सर्व दिवस सहभागी होणे आवश्यक आहे! लवकरात लवकर स्थानिक अथवा मुख्य कार्यालयात नावनोंदणी करावी. शिबिराबाबतचे अन्य तपशील व माहितीपत्रक स्थानिक कार्यालयांमध्ये मिळेल. प्रवेशसंख्या मर्यादित!


## ऐका होऽऽ शब्दांना कंठ फुटले

### "पंख सुरांचे"

**(९० मिनिटांची ध्वनिफीत)**

**या आवाजी दुनियेची वैशिष्ट्ये**

- डॉ. जयंत नारळीकरांची मुलाखत
- द. मा. मिरासदारांचे कथाकथन
- मंगेश पाडगांवकरांचे काव्यवाचन
- पक्ष्यांचे आवाज अन् त्यांची ओळख

*याशिवाय समूहगीत, लोकगीत, नाट्यछटा, कल्पक जाहिराती, अशा धमाल कल्पनांचा मिलाफ!*

**किंमत रु. ४०/-**

### "प्रबोधन गीते" भाग २

**(स्फूर्तिगीतांची ध्वनिफीत)**

- क्षितिज नवे मज सतत बोलवी
- विश्वास हा मनीचा सांगू उभ्या जगाला
- शतकातुनि द्रष्ट्यांचे स्वर निनादती
- तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या.
- ध्येयाचा सुगंध लाभला जीवना

ज्ञान प्रबोधिनीच्या युवक-युवती कार्यकर्त्यांनी रचलेल्या एकूण ११ स्फूर्तिगीतांची वैशिष्ट्यपूर्ण ध्वनिफीत

**किंमत रु. ४०/-**

छात्र प्रबोधनच्या स्थानिक कार्यालयात उपलब्ध

## 'छात्र प्रबोधन'चा इंग्रजी अंक

छात्र प्रबोधन मासिकाचा अनेक वैशिष्ट्यपूर्ण विषयांनी युक्त, आकर्षक छपाईचा पहिला इंग्रजी अंक प्रकाशित होत आहे.

**किंमत रु. १५/-**

२० ऑक्टोबरनंतर सर्व केंद्रांवर उपलब्ध!

ज्ञान-मनोरंजन-कृति-विचार यांचा अनोखा समन्वय आता इंग्रजीतून सुद्धा!

'छात्र प्रबोधन'चा दीपावली विशेषांक विकत घेऊन अनेकांना भेट द्या!

किंमत रु. ४०/-

वर्ष ६ अंक ३
सौर आश्विन
शके १९१९

छात्र
# प्रबोधन

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी
ने ज्योतिर्जगतात।

**संपादक, प्रकाशक**
महेंद्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया **B.E.,M.Ed**
विवेक पोंक्षे **M.Sc.,M.Ed**
अनघा लवळेकर **M.A.,M.Ed**
शैजला देशमुख **M.A.,M.Ed**
**मुखपृष्ठ पारदर्शिका**
डॉ. प्र. के. घाणेकर
**मुखपृष्ठ व आतील चित्रे:**
भास्कर सगर
**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, पुणे
**सपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'** ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
०२१२-४७७६९१, ४७८०९५
**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ९ आश्विन, शके १९१९
१ ऑक्टोबर १९९७
वर्गणी
भारतात
**वार्षिक**-रु. १२५/- **द्वैवार्षिक**-रु. २४०/-
**त्रैवार्षिक**-रु.३५०/- **आजीवन**-रु. २०००/-
**भारताबाहेर - वार्षिक** ३० डॉलर

# अंतरंग

२ **संवाद**
३ **कथा - स्वरमोहिनी :** एल. के. कुलकर्णी
७ **आस्वाद कलेचा- चित्रकला :** भास्कर सगर
१० **कविता पानोपानी**
११ **तिमिरातून प्रकाशाकडे:** चि. चिन्मय कानिटकर
१३ **अभ्यासातील स्वावलंबन-श्रवण :**प्रा. विवेक पोंक्षे
१५ **सण-उत्सवांचे नाते आमच्याशी :** चारुता पुराणिक
१८ **विज्ञान - का व कसे?**
१९ **एक बहुरंगी व्यक्तिमत्त्व-विजय कुवळेकर:** सुषमा निसळ
२२ **ओळख-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेची:** स्वाती ढेकणे
२६ **प्रतिसाद वाचकांचा :** शैलजा देशमुख
२७ **छात्र प्रबोधन प्रश्नावली : १९९७**
२९ **नोव्हेंबर महिन्यासाठी उपक्रम व कार्यक्रमांचे वृत्त**
३० **दीपावली विशेषांक वितरण व्यवस्था व केंद्रांचे पत्ते**

*शरदाचा साज करेल पुलकित गात्र गात्र, शीतल चांदण्यात जागवू पौर्णिमेची रात्र.*

# ‘चाहूल’

छात्र प्रबोधनच्या

## दीपावली विशेषांकाची

- विविध रसांच्या बहुरंगी कथा
- शब्दलयींच्या सौंदर्याने मोहविणाऱ्या कविता
- नवनिर्मितीचा आनंद देणारी कला-कौशल्ये
- ज्ञान-विज्ञानावरील विविधांगी लेख
- शब्दभांडारात रमविणारे ललित साहित्य
- मनोरंजक व बुद्धीला चालना देणारी कोडी.
- थोडासा विचार करायला लावणारे चिंतन

...अन् याशिवाय खूप काही

**या साहित्यकृतीचे शिल्पकार आहेत...**

**विजय देवधर, हरिहर आठल्येकर, बाळ गाडगीळ, शांता शेळके, जयंत नारळीकर, वा. ना. दांडेकर, वि.म. कुलकर्णी, अरुणा ढेरे, वीणा गवाणकर, व. दि. कुलकर्णी, रवींद्र भट, वसंत पटवर्धन, मंगला गोडबोले, मोरेश्वर गुर्जर, मधु मंगेश कर्णिक, प्रकाश तुपे, रवींद्र पिंगे, विवेक घळसासी, शेखर नानजकर आणि इतर कितीतरी....**

**याशिवाय यावर्षीचा विशेष लेख**

**‘मी कसा घडलो?’**

मध्ये खास आपल्यासाठी लिहिताहेत...

**नारायण सुर्वे** (साहित्य)

**निळू फुले** (अभिनय)

**रोहिणी भाटे** (नृत्य)

**भैयासाहेब ओंकार** (चित्र)

**हेमंत टाकळकर** (क्रीडा)

**विश्वास कचरे** (शेती)

**डॉ. अशोक वागळे** (वैद्यक)

अशी विविध क्षेत्रांमधील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे...

**ही तर निव्वळ झलक!**

**शिवाय आकर्षक भेट आहेच.**

**किंमत रु. ४०/-**

**सवलतीची किंमत ३५/-**

सभासदांनी अंक वितरणकेंद्रावरून घेऊन जावा. आपल्या मित्रमैत्रिणींसाठी जास्तीच्या अंकाची मागणी लवकरात लवकर वितरण केंद्रावर नोंदवा!

## संवाद

प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

गणेशोत्सवाची धामधूम संपवून सर्वजण सहामाही परीक्षेच्या अभ्यासात बुडून गेला असाल. लवकरच परीक्षा संपेल अन् दीपावलीची सुट्टी तुमची वाट बघत असेल. ही दिवाळीची सुट्टी अधिक मजेत अन् आनंदात जावी, म्हणून छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाची तुम्ही आतुरतेने वाट पाहात असाल, हो ना!

मागच्या महिन्यात लातूर-परभणी भागात दौऱ्यावर होतो त्यावेळी तेथील सभासदांच्या मेळाव्यात गप्पा मारताना एका गोष्टीने खूप धक्का बसला. असं नेमकं घडलं तरी काय?

मेळाव्यानंतरच्या गप्पांमध्ये नववीतल्या एका सभासदाने सांगितले, ‘‘आमच्या वर्गातल्या पहिल्या पाच क्रमांकाच्या आम्हा विद्यार्थ्यांची छान मैत्री होती. गेल्या वर्षापर्यंत आम्ही एकत्र अभ्यास करायचो, एकमेकांच्या अडचणी सोडवायचो, उत्तरपत्रिकांवर चर्चा करायचो. पण यावर्षी अचानक आमच्यामध्ये तुटकपणा आल्यासारखा वाटतोय. आता आम्ही एकमेकांशी फारशे बोलत नाही. उलट एकमेकांकडे संशयाने बघतो.’’... आणि असं बरंच काही तो सांगत होता. जवळचे मित्र नसल्याची बोच त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. मी म्हटलं, ‘‘असं एकदम कसं घडलं? काही भांडणं वगैरे झालीत का? काही विशेष घडलं का?’’ त्यावर तो म्हणाला, ‘‘छे! तसं काहीच झालं नाही. पणं आता पुढच्या वर्षी आम्ही दहावीत जाणार, मग तेथे दोन-दोन मार्कांसाठी क्रमांक खालीवर होणार. एकत्र चर्चा करून अभ्यास केला, किंवा गप्पा मारता मारता १-२ नवीन मुद्दे दुसऱ्याला कळले अन् त्याने ते परीक्षेत लिहिले तर आपल्यापेक्षा त्याला अधिक गुण मिळतील असं वाटायला लागल्यामुळे हे सगळं घडतं असावं असं मला वाटतं. कारण आता कोणी आपल्या उत्तरपत्रिकासुद्धा एकमेकांना दाखवत नाही., वह्या देणं तर बंदच केलंय, त्यात काही वेळेला घरातले सुद्धा या मैत्रीच्या आड येतात. मला मात्र याचं खूप वाईट वाटत; मी काय करू?’’ असा प्रश्न त्याने विचारला. त्याच्याशी नंतर मी सविस्तर बोललो. पण या गोष्टीने मी खूप अस्वस्थ झालो. या जीवघेण्या शर्यतीत खिलाडूवृत्ती, मनाचा उमदेपणा, मोठेपणा, मोकळेपणा, मदत करण्याची वृत्ती तर कमी होत नाही ना? मित्रत्त्वाचं, आपुलकीचं नातं तर हरवत नाही ना! तुच्या बाबतीत काय घडतयं? छात्र प्रबोधनचे सभासद म्हणून तुम्ही त्याचा काही विचार करता का? खरे, जिवलग (नुसत्या पार्ट्यांपुरते एकत्र जमणारे नव्हेत...) मित्र मिळवण्याचे तुमचे प्रयत्न चालू आहेत का? त्यात काय अडथळे-अडचणी तुम्हाला जाणवताहेत? यासर्वांबाबत जरूर कळवा.

बाकी सहामाही परीक्षा तशी किरकोळच... पण तरी छान अभ्यास करून चांगले गुण मिळवून टाका आणि दिवाळीच्या सुट्टीतील तंबूतील शिबिरातही अवश्य सहभागी व्हा!


दिवाळी अंक, वितरण केंद्रावरून घेऊन जाताना, या अंकातील प्रश्नावली मनापासून, विचारपूर्वक अन् मोकळेपणाने पूर्ण भराल ही अपेक्षा! बरंय तर...

सस्नेह तुमचा

(महेंद्र सेठिया)

# स्वरमोहिनी

– एस. के. कुलकर्णी



बिट्टू, अप्पू आणि लिली तिघेही गप्पा मारत घराकडे जात होते. महिनाअखेर असल्यामुळे आज शाळा लवकर सुटली होती. मात्र लवकर घरी जाण्याच्या आनंदापेक्षा एका खास विषयावर त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. तो विषय होता, जाफरकाका.

जाफरकाका आपल्या वडिलांचे जिवलग मित्र आहेत, याचा बिट्टूला फार अभिमान. आणि का वाटू नये. एखादा जगप्रसिद्ध माणूस तुमच्या वडिलांना मधूनमधून पत्रे पाठवतो, वर्षा दोन वर्षांला अगदी घरच्यासारखा चार दिवस मुक्कामाला येतो ही काय साधी गोष्ट आहे?

होय, जाफरकाका म्हणजेच उस्ताद जाफरअलीखान. ऐन तारुण्यातच जनतेकडून ''उस्ताद'' पदवी मिळवलेले प्रख्यात गायक जाफरकाका. बिट्टू आणि लिलीचे पण फार आवडते. त्यांचे शास्त्रीय गाणं बिट्टू, लिलीला फारसं कळायचं नाही, पण तरीही जाफरकाकांचं घरी मुक्कामाला येणे म्हणजे धमाल मज्जा हे त्यांनी अनेकदा अनुभवलं होतंच. बिट्टू आणि लिलीमुळेच अप्पूलाही ते आवडू लागले होते.

बिट्टूचे बाबा आणि जाफरकाका बालपणापासून एकत्र शिकले हाते. इंजिनिअरिंग एकत्र शिकले होते. एकत्रच एका रूमवर ते राहायचे. दोघांनाही संगीताची आवड. दोघांनीही गाण्याचा क्लास लावला; पण जाफरकाकांना गायनाने पुरतेच झपाटले. इंजिनिअरिंग कसंबसं पास होऊन –मात्र गायनाची तपश्चर्या करून जगप्रसिद्ध झाले. बिट्टू, लिलीचे बाबा इथे इंजिनिअर म्हणून कामाला लागले, तरी दोघांची मैत्री मात्र कायम होती.

जाफरकाकांचे नेहमी देशात परदेशात दौरे होत. तिथे कुठेही विशेष असे स्वत:साठी काही घेतलं की, त्यांना वामनचीही आठवण व्हायची. एकदा तर त्यांनी गंमतच केली. जाफरकाका गाताना खास जपानहून आणलेली इलेक्ट्रॉनिक पेटी वापरत. ती त्यांची फार लाडकी. त्यांनी त्या पेटीचे नामकरणही केले होते, 'स्वरमोहिनी' तर सांगायची गंमत म्हणजे, 'स्वरमोहिनी'च्या जोडीची पेटी, अगदी हुबेहूब पेटी, त्यांनी बिट्टूच्या वडिलांना भेट दिली.

जाफरकाकांचं मराठी छान होतं आणि ते बिट्टूच्या बाबांना 'वामन' म्हणून एकेरी नावानेच हाक मारत.

जाफरकाका आले की घरचे वातावरण बदलून जाई. रोज गप्पा, खाणं, हास्य-विनोद यात वेळ कसा गेला कळतच नसे, निरनिराळ्या मैफलीतील गायनकिस्से व नकला सांगून, जाफरकाका सगळ्यांना खदाखदा हसवत.

आज ते येणार याची तार परवाच आली होती. अचानक जाफरकाका येणार याचा मुलांना तर आनंद झाला होता आणि याचमुळे दुपारी शाळेतून ते थेट घराकडे निघाले होते. आवाज न करता घरी यायचं आणि जाफरकाकांना एकदम सामोरे जाऊन त्यांची गंमत करायची, असा तिघांचा प्लॅन होता. तिघेही हळूच घरी आले आणि आवाज न करता घरात शिरले. घरातील शांतता बघून 'जाफरकाका आले नाहीत की काय?' या शंकेने त्यांचा थोडा विरस झाला; पण तेवढ्यात त्यांना जाफरकाकांचा आवाज ऐकू आला. हे काय? आज घरात गुपचूप काय बोलत बसलेत बाबांशी, तिघांनाही आश्चर्य वाटले.

बाबा, जाफरकाका आणि आई आतल्या खोलीत गंभीरपणे बोलत बसले होते. तिघेही दाराला कान लावून गुपचूपपणे आतले बोलणे ऐकत बसले. ''हे असं झालंय बघा!'' गंभीर आवाताज जाफरकाका सांगत होते, ''वामन! मला तर ते गाणं, त्या मैफिली सारंच नकोसं झालंय. अजूनपर्यंत ही गोष्ट माझ्याच लक्षात आली आहे, पण उद्या जाहीर झाली तर? लोक माझं गाणं ऐकायला घाबरतील.''

''ही काय भानगड बुवा?'' अशा नजरेने अप्पूने बिट्टूकडे पाहिले. ज्यांच्या देशविदेशातल्या संगीताच्या कार्यक्रमांना ॲडव्हान्स बुकींग करावं लागतं, त्या जाफरकाकांना कार्यक्रमाला येण्यासाठी लोक का घाबरतील? पोरांना कळवेना.

तेवढ्यात बिट्टूच्या आईचा आवाज आला, ''पण भाऊजी! हा प्रकार

केव्हापासून होतोय?''

''तीन महिने झाले भाभी, नोव्हेंबर अखेर माझा कार्यक्रम जपानमध्ये टोकियोला झाला. नेहमीसारखा रंगला. त्यानंतर पंधरा दिवसांनी हिरोशिमा या गावी कार्यक्रम झाला. सहा डिसेंबरला हिरोशिमावरील बाँबहल्ल्याचा स्मृतिदिन पाळतात ना जपानमध्ये, त्यानिमित्त माझा कार्यक्रम झाला. मध्यवर्ती टाऊन हॉलमध्ये. दोन अडीच हजार श्रोते होते. मी आपले नेहमीचेच राग घेतले. मध्यंतरापूर्वी आभोगी रागाचे वेळी द्रुतलयीत एका समेवर मी प्रेक्षकांकडे पाहिले. काय सांगू भाभी! शेकडो लोकांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहात होते. आपल्या गायनाचा हा प्रभाव बघून मी थरारून गेलो. अख्खा कार्यक्रम संपेपर्यंत शेकडो प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रुधारा. दुसऱ्या दिवशी तिथल्या सर्व पेपरांमध्ये माझं कौतुक. पण मी स्वत:ची समजूत घातली. म्हटलं, जाफरबेटा, फार फुगून जाऊ नकोस. हे लोक तुझ्या गायनापेक्षा हिरोशिमाच्या त्या हुतात्म्यांच्या आठवणीने व्याकुळ झाले असतील!''

''बरं मग? त्यानंतर भारतात किती कार्यक्रम झाले?'' बिट्टूचे बाबा आणि आई कमी बोलून जाफरकाकांच मन मोकळं करण्याची संधी देत होते.

''यानंतर डिसेंबरअखेर भारतात आलो. कानपूर, इंदोर, हैद्राबाद, मुंबई या गावी पूर्वीही माझे कार्यक्रम झालेत, पण या वेळेस वेगळेच प्रकार, कानपूर इंदौरच्या कार्यक्रमात अर्ध्याहून अधिक लोकांचे डोळे भरून आलेले. कार्यक्रमाच्या मध्यंतरात दोघा श्रोत्यांना चक्कर आल्यामुळे थोडा गोंधळ झाला, पण कहर झाला तो मुंबईत, विचार कर वामन, माझे गाणे ऐकणाऱ्या शेकडो प्रेक्षकांच्या डोळयांतून अश्रुधारा वाहताहेत आणि उत्तरार्धात एकेक करीत आठ लोक बेशुद्ध पडताहेत.''

''आठ जण? आणि बेशुद्ध?'' बिट्टूच्या बाबांचे उद्‌गार स्पष्ट ऐकू आले.

''हो ना! हे प्रकार माझ्या गायनांच्या वेळेस घडताहेत हे अजून लोकांच्या लक्षात आलेलं नाही, पण मला याची खात्री पटली आहे आणि म्हणूनच चिंता वाटते''

बिट्टूच्या बाबांचा हसण्याचा आवाज आला. ते म्हणाले, ''वाऽऽरे कलाकार! अरे जाफर, यात चिंता करण्यासारखं काय आहे? तुझ्या गायनाचं सामर्थ्य किती आहे याचा हा पुरावाच आहे. बघ उमा, मी आणि जाफर एकाच गुरूचे शिष्य, एकाच वेळी संगीताचे धडे घेतले पण जाफर कुठल्याकुठे गेला. मी संगीताचा रियाझ सोडू नये म्हणून त्यानं मुद्दाम त्याच्यासारखीच पेटी ''स्वरमोहिनी'' मलाही आणली. पण मी आपला बाथरूमसिंगर बनलोय आणि जाफर मात्र आपल्या गायनाने लोकांना बेहोष करून टाकतोय.''

जाफरकाका काकुळतीने म्हणाले, ''तुझ्या लक्षात कसं येत नाही रे वामन, माझ्या गायनात फक्त दहा वर्षात एवढं सामर्थ्य कुटून आलं? परमेश्वरानं एवढी कृपा माझ्यावर का केली असेल? आणि ही कृपा की अवकृपा? हे सारं कळल्यावर लोक माझ्या कार्यक्रमाला फिरकणार नाहीत; पण ती वेळ येण्याआधी मी गायनच सोडून द्यायचं ठरवलंय.''

''हे बघा भाऊजी'' बिट्टूची आई म्हणाली, ''संगीत हा तुमचा प्राण आहे. तुम्ही म्हणता ते खरं असेल, पण हा सारा कदाचित योगायोगही असू शकेल. आज रात्री आम्ही तुमच्या गायनाचा कार्यक्रम ठेवलाच आहे. त्यात काय होतं ते बघू आणि मग उद्या त्यावर विचार करू. उगाच उतावळेपणा करू नका. आता मी तुम्हाला चहा आणते करून.''

त्यांच्या गप्पा संपल्या हे मुलांनी ओळखले. बिट्टूने अप्पू-लिलीला खुणावताच तिघेही उठले आणि दणादण पाय आपटत लिली ओरडली, ''आई! आम्ही आलो.'' एकंदरीत जाफरकाकांची यावेळी भेट वेगळीच होणार होती.

रात्री आठ वाजता जाफरकाकांच्या गायनाचा कार्यक्रम होता. जवळचेच पण संगीतप्रेमी असे चाळीसएक लोक होते. बिट्टूच्या बैठकीच्या मोठ्या हॉलमध्ये तयारी पूर्ण होईपर्यंत बिट्टूचे बाबा काही म्हणाले नाहीत; पण कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी मात्र त्यांनी तिघांनाही सांगितलं.

''हे पहा! तुम्हाला शास्त्रीय गायन काही कळत नाही. तेव्हा तुम्ही तिघेहीजण अप्पूच्या घरी जाऊन टी.व्ही बघत बसा.''

कधी नव्हे ती मुले आज्ञाधारकपणे वागली. धाडधाड जिना उतरत खाली गेली. पुढे सगळं ठरलेलचं होतं. बिट्टूच्या घरामागच्या पानसेकाकांच्या गच्चीवर, तिथून शितूकाकांचा जिना आणि तो चढून दोन फुटांची लाँग जंप मारली की परत बिट्टूच्या गच्चीवर. तिघेहीजण न बोलता बिट्टूच्या गच्चीवर मागच्या बाजूस असणाऱ्या कोपऱ्याकडे गेले. बैठकीच्या मोठ्या हॉलचं व्हेंटिलेटर उघडं होतं आणि आतलं सगळं व्यवस्थित दिसत होतं. अप्पू, बिट्टू आणि लिली तिघांनीही जागा धरल्या.

जाफरकाका थोड्या उंच गादीवर बसले होते. त्यांच्या माडीवर तिरपी त्यांची लाडकी स्वरमोहिनी पेटी होती.

कार्यक्रम अर्थात उत्तम चालला असावा. जाफरकाकांचा भरदार आवाज, त्यांच्या पेटीचे-स्वरमोहिनीचे सूर आणि तबल्याचा ठेका यासोबत ''वा!वा!'' वगैरे दाद दिल्याचे शब्दही ऐकू येत होते. सर्वजण माना डोलावत जाफरकाकांकडेच बघत होते. अप्पूला बिट्टूने खुणावले. पोंक्षेकाका आणि पाटीलकाकांचे डोळे भरून आले होते आणि द्वारका काकू पुन्हा पुन्हा नाक पुसत होत्या. बघता बघता बैठकीचे रूप बदलू लागले. हळव्या निशाताईपासून तो खडूस नानीपर्यंत आणि प्रेमळ रघुनानापासून तो बसक्या अण्णूपर्यंत साऱ्यांच्या डोळयातून पाणी वाहू लागले. बिट्टूच्या बाबांच्या डोळ्यांना तर धाराच लागल्या होत्या. या सगळ्या प्रकाराकडे अप्पूची आई मात्र कोरड्या नवलभरल्या डोळ्यांनी पाहात होती. जाफरकाका डोळे मिटून-तल्लीन होऊन पेटीवर गात होते. बरोबर चाळिसाव्या मिनिटाला नेहमी भिंत धरून बसणारे पोंक्षेकाका किंचित कलंडले. पण नाईकांच्या मधूला भिंतीचा आधारही नव्हता. तो सरळ मागे पाटीलकाकांच्या अंगावरच पडला. डोळे पुसत पाटीलकाकांनी त्याला थोडी जागा मोकळी करून दिली आणि पडू दिलं. मैफिलीत चार -दोघांनी झोपणं ही नवलाची गोष्ट नव्हती; पण एवढ्या उघड झोपावं याचं नवल त्यांच्या भरून आलेल्या डोळ्यांत होतं, पण पन्नासाव्या मिनिटाला जेव्हा बिट्टूचे बाबाच धाडकन मागे शितूकाकांच्या अंगावर पडले तेव्हां एकच गोंधळ उडाला. ताबडतोब गाणं थांबवून घाबरलेले जाफरकाका जवळ आले आणि हाका मारत, बिट्टूच्या बाबांना उठवू लागले.

''वामन, ए वामन, अहो भाभी!'' हे त्यांचे शब्द ''काय झालं, कसं झालं?'' च्या गदारोळात बुडून गेले.

आणि आता मात्र अप्पू, बिट्टू आणि लिली धाडधाड जिना उतरून हॉलमध्ये आले.

सकाळीच बिट्टू आणि अप्पूमध्ये रात्रीच्या प्रकारावर चर्चा झाली आणि त्याच वेळी अप्पूने आपली योजना बिट्टूला सांगितली.

दुपारी शाळेत जाताना लिलीने आपली कामगिरी पूर्ण करून अप्पूला रिपोर्ट दिला.

''जरी बाबा रात्री दहा मिनिटांनंतरच शुद्धीवर आले तरी जाफरकाका फार उदास आहेत. बाबा, आई आणि जाफरकाका बरेचसे अबोल बनलेत. त्यांच्या लाडक्या स्वरमोहिनीचा विषय काढताच, आपल्या लाडक्या पेटीचे गुणगान करीत बसतात; पण आज मात्र ते बोलायलाच तयार नाहीत. परवा जपानला गेले होते तेव्हा त्यांनी स्वरमोहिनी दुरुस्त करून घेतली त्याऐवजी विकूनच टाकली असती तर



बरं'' असंही ते म्हणाले., लिलीने थोडक्यात माहिती दिली.

शाळा आली तेव्हा लिली वर्गात गेली; पण अप्पू, बिट्टू मात्र कॉलेजकडे गेले.

संध्याकाळी पोरांचा आग्रह ऐकून बाबा थक्कच झाले. एवढं सगळं रामायण घडल्यावर पुन्हा आज मैफल भरवायची? आपण सगळं बोलणं कसं ऐकलं आणि जाफरकाकांची सध्याची परिस्थिती आपल्याला कशी माहीत आहे, हे पोरांनी सांगून टाकलं. आज पुन्हा मैफल भरवा. त्यात जाफरकाकाला गाऊ द्या. कालचा प्रकार आज घडणार नाही असे तिघा मुलांचे म्हणणे. बाकी काही बोलायला मात्र तिघेही तयार नव्हते. 'कार्यक्रम झाल्यावर सांगू' असं तिघांचंही म्हणणं.

जाफरकाका तर मुळीच तयार नव्हते. अतिशय निराश स्वरात ते म्हणाले, ''मुलांनो, तुमचे माझ्याबद्दलचे प्रेम मी समजू शकतो. पाच कार्यक्रमांत हा प्रकार पुन्हा पुन्हा घडलाय. तुम्ही लहान मुलं यावर काय उपाय करणार? ही गोष्ट तुमच्या आटोक्यातली नाही. जाऊ द्या. माझी इच्छा जन्मभर संगीत आराधना करण्याची आहे; पण नशिबात नाही.'' वगैरे वगैरे. तिन्ही मुलांनी फारच हट्ट धरल्यावर फक्त अर्ध्या तासाचा कार्यक्रम ठरला. ही मैफल अप्पूच्या घरी ठरली. अप्पूच्या बाबांच्या ऑफिसमधल्या आणि शेजारच्या पाच-पंचवीस लोकांच्यापुढे कार्यक्रम झाला.

यावेळी अप्पू, बिट्टू आणि लिली तिघेहीजण अगदी समोरच्या रांगेत होते. स्वरमोहिनी मांडीवर तिरपी घेऊन जाफरकाकांनी गाणे सुरू केले. ते डोळे मिटून गात होते; पण अप्पूला गंमत वाटत होती, त्याच्या आणि बिट्टूच्या बाबांची. ते दोघेहीजण अधूनमधून मान वळवून किंवा तिरप्या नजरेने लोकांच्या आणि एकमेकांच्या डोळ्याकडे पाहात होते.

पण काहीच झाले नव्हते. तीन मुले आणि त्यांचे आईवडील सोडून सारेजण गायनात तल्लीन झाले होते. दहा मिनिटांत गायनाने श्रोत्यांची पकड घेतली आणि ''वाऽवाऽ'' वगैरे दाद देत श्रोते गाण्याशी एकरूप झाले. सुमारे अर्धा तासानंतर जाफरकाकांनी डोळे उघडून पाहिले. सर्व मैफिलीवर नजर टाकली आणि त्यांचा चेहरा आनंदून गेला. तिघा मुलांकडे ते आश्चर्यचकित नजर टाकून ते प्रसन्नपणे पुन्हा एकदा गायनाकडे वळले आणि ती मैफल संगीताच्या वर्षावात भिजून गेली.

मैफल संपल्यानंतर चहापान घेऊन सगळे घरी गेले होते. अप्पूच्या घरी अप्पू, बिट्टू, लिली यांना घेऊन त्यांचे आईवडील आणि जाफरकाका बसले होते.

''अप्पू, लवकर सांगून टाक ना.'' जाफरकाका तेव्हापासून तिसऱ्यांदा म्हणाले, ''गेले चार महिने मला छळणारा हा प्रश्न तुम्ही एवढ्या सहज कसा सोडवलात? काय जादू केलीत? की माझ्या गायनाला झालेली बाधा उतरवलीत कुठल्या तरी मंत्रानेच?'' जाफरकाकांची आतुरता पाहून पोरांना गंमत वाटत होती.

अखेर अप्पू उभा राहिला. ''तसं सारं फार सोपं आहे. जाफरकाका! तुमच्या कार्यक्रमात लोकांवर होणारे परिणाम पाहून तुम्हाला थोडा आनंद पण झाला असणार, त्यामुळे तुमचे एका गोष्टीकडे दुर्लक्ष झाले.''

''कोणत्या?'' भुवया उंचावत जाफरकाका म्हणाले. एवढ्याश्या पोराने असे मुद्देसूद बोलावे याचे त्यांना आश्चर्य वाटले.

''तुमच्यासमोर बसलेल्या लोकांवरच साऱ्याचा परिणाम होत होता. तुम्ही स्वत: किंवा तुमच्या आजूबाजूचे किंवा तुमच्या मागच्या लोकांवर असा परिणाम होत नव्हता. परिणाम तुमच्या गायनाचाच असता तर तो सर्व ऐकणाऱ्यांवर व्हायला पाहिजे होता.''

जाफरकाका लगेच म्हणाले, ''अरे, पण असं पुन्हा पुन्हा माझ्याच कार्यक्रमात घडत होतं ना, मग हा परिणाम सुरांचाच म्हणजेच माझ्याच गायनाचा नव्हता का?''

अप्पू शांतपणे त्यांच्याकडे वळून म्हणाला, ''परिणाम सुरांचाच होता हे खरे; पण ते सूर तुमच्या गायनांचे नव्हते.''


बिट्टूचे बाबा मध्येच म्हणाले,''हे काय बोलतोयस हे मला तर मुळीच कळत नाहीये.''

अप्पू म्हणाला, ''काका! आपण ज्याला ध्वनी म्हणतो त्याचे शास्त्रीय स्वरूप काय? ध्वनी म्हणजे हवेतील विशिष्ट क्रमाने कंप पावणाऱ्या लहरी.''

बिट्टूचे बाबा म्हणाले, ''ते सारं आम्हाला कळलंय संगीताच्या क्लासमध्ये. कंपनसंख्या निश्चित केलेल्या ध्वनिलहरींनाच सूर म्हणतात. ही व्याख्यापण आम्ही पंधरा वर्षापूर्वीच पाठ केलीय.''

अप्पू त्यांच्याकडे वळून म्हणाला,''काका! तुम्ही शिकलात ते ऐकू येणाऱ्या ध्वनिलहरींबाबत. परंतु ऐकू न येणाऱ्या ध्वनींचे काय? आपल्याला साध्या कानांनी सुमारे सोळा ते संख्यावीसहजारपर्यंत कंपन असणाऱ्या

(पान २१ वर पुढे चालू)



आस्वाद कलेचा

# रेषा, रंगांचा मोहक आविष्कार चित्रकला

**– भास्कर सगर**

रविवारचा दिवस. छोटू बाबांना म्हणाला, ''बाबा रोज रोज अभ्यास करून कंटाळा आलाय मला. आज मी चित्रं काढत बसणार आहे.''

बाबांचा होकार मिळताच स्वारी रंग, ब्रश, कोरे कागद, पाण्याचे भांडे घेऊन चित्रकामास बसली. नव्हे! जणू चित्रसमाधीसच बसली.

छोटू कितीतरी वेळ चित्र काढण्यात मग्न होता. सकाळचा नाष्टा नाही की जेवण नाही. बाबांना त्याचं फारच कौतुक वाटलं. त्याच्या चित्रातून रंगीबेरंगी फुलं डोलत होती. त्यावर नाना रंगांची फुलपाखरे स्वच्छंदपणे बागडत होती. मागे दुरून दिसणारा जांभळट डोंगर, त्यामागून हळूच डोकावून पाहणारा पिवळाधमक सूर्य, निळ्या-निळ्या आकाशात उडणारे पांढरेशुभ्र बगळे, डोंगराच्या खाली दिसणारी हिरवीगार वनराई. त्यातून वाहणारा निळसर पाण्याचा झरा हे पाहून बाबा बराच वेळ हरखून गेले...


चित्रकला हे एक आत्मसमाधानाचं फार मोठं साधन आहे. चित्रकला ही 'कला' लहानांपासून मोठ्यांपर्यंत कोणीही जोपासावी अशी कला आहे. यात चित्र काढणाऱ्यालाही आणि पाहणाऱ्यालाही समाधान मिळतं.

चित्रकलेत आपला सर्वात श्रेष्ठ गुरू कोण असेल तर तो निसर्ग. माझ्या मते चित्रकार हा जन्मजात म्हणण्यापेक्षा निसर्गतःच चित्रकार असतो. म्हणजे निसर्गच त्याला चित्रकार बनवतो म्हटले तर वावगे होणार नाही. याचं साधं-सोपं उदाहरण म्हणजे आपण जर चार-पाच वर्षांच्या मुलांना चित्र काढायला सांगितलं तर ते प्रथम कुठलं चित्र काढतील? निसर्गाचंच. डोंगर, सूर्य, नदी, झाडे आणि पक्षी. हे सर्व काढण्याची त्यांना स्फूर्ती कुठून मिळाली? निसर्गाकडूनच. कधी प्रत्यक्ष डोंगर पाहिलेला नसतानाही ते आपल्या कल्पनाशक्तीने डोंगर-दऱ्यांचे चित्र रेखाटू शकतात.

चित्रकला ही शिकवल्याने कधीच येत नाही. मुळात त्याची आवड असावी लागते आणि आवडीतूनच कला निर्माण होते. एखाद्याला चित्रकला शिकायची असेल तर त्यासाठी क्लास लावलाच पाहिजे असे काही नाही. घरबसल्या देखील आपण उत्कृष्ट चित्रे काढायला शिकू शकतो. घरातील वेगवेगळ्या वस्तू, त्यांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी करून वस्तुचित्र (Still life) रेखाटता येते. तसेच निसर्गातील झाडे, पाने-फुले, डोंगर आणि उत्तुंग अशी कल्पनाशक्ती की ज्यामुळे आशयचित्रे (इलस्ट्रेशन) देखील उत्कृष्टपणे रेखाटू शकतो.

आशयचित्र म्हणजे एखाद्या मुद्द्यांवर किंवा गोष्टीवर आधारित केलेले प्रसंगचित्र. उदा. तहानलेला कावळा. त्याला खूप तहान लागते. तो उडतउडत जातो. त्याला एक मडके दिसते. त्यात थोडेच पाणी. डोक्यात विचार येतो. शेजारी पडलेले खडे मडक्यात टाकतो. पाणी वर वर येते. कावळा पाणी पितो आणि उडून जातो. या गोष्टीत एक विषय आहे आणि त्यासाठी वापरलेल्या फिगर्स (आकार) कावळा, मडके आणि खडे. याचा कल्पनाशक्तीचे केलेला वापर आणि त्यातून साकार झालेली एक उपदेशात्मक अशी गोष्ट की ज्या कथेत जिद्द आणि कल्पकता दिसून येते.

त्याचप्रमाणे चित्रात आवश्यक आहे रंगसंगती! रंगाचेही विरोधी रंगसंगती, शीत रंगसंगती, उष्ण रंगसंगती असे विविध प्रकार आहेत. रंगाच्या छटेमुळेच चित्राचा विषय, त्यातला भाव प्रकट होतो. चित्रात रेषा आणि आकारांबरोबरच रंगाला देखील महत्त्व आहे. आपल्या राष्ट्रध्वजाचे रंग



आणि त्याचे अर्थ आपणा सर्वांना माहिती असतीलच.

चित्रलिपी हाही एक चित्रकलेचाच भाग आहे. प्राचीन काळी जेव्हा अक्षरलिपी अस्तित्वात नव्हती, तेव्हा चित्रलिपीचा वापर केला जात असे. ब्राम्ही लिपी आणि इजिप्शियन चित्रलिपी आपणास ठाऊक असेलच. तेव्हा अक्षरांच्या जागी चित्रं काढली जात.

चित्रलिपीवरून एक आठवण झाली. माझा जळगावचा मित्र एकदा पुण्यात मला भेटायला आला होता. माझी काही भेट झाली नाही. परंतु त्याने  चिठ्ठी लिहून ठेवली होती, ती

'मी  आज पुण्यात आलो. तुझ्याकडे  मी येऊन गेलो. तुझी  झाली नाही. मी उद्या येईन आणि  परत निघणार आहे.'

आता शेकड्यांवर भाषा आहेत. भाषांच्या लिप्या आहेत. त्यामुळे चित्रलिपी सहसा कुणी वापरत नाही. परंतु मुलांनी आपल्या जिवलग मित्रांना असे चित्रलिपीत पत्र लिहून पाठवायला काहीच हरकत नाही. त्यातून ज्ञान, चित्रकौशल्य तर वाढतेच आणि बुद्धीलाही चालना मिळते. कल्पकता द्विगुणित होते.

आपण दर रविवारच्या वर्तमानपत्राचा अंक उघडला, की त्यात तुम्हाला व्यंगचित्रे हमखास पाहायला मिळतात. आपण जर एखादे व्यंगचित्र (कार्टून) नीट निरखून पाहिले तर त्यात खूप काही दडलेलं तुम्हाला दिसेल. सोबतचे चित्र पहा.

दाताचे एक डॉक्टर आणि पेशंट यांच्यावरील हा विनोदी प्रसंग आहे. दात काढत असताना डॉक्टरांची



पक्कड पेशंटच्या पोटात जाते. तेव्हा डॉक्टर पेशंटच्या पोटात हात घालून चाचपडत आहे. या चित्रात मंगेश तेंडुलकर यांनी उत्कृष्टपणे भाव रेखाटले आहेत. पेशंटचा तो केविलवाणा आणि घाबरलेला चेहरा तसेच डॉक्टरांची चाचपण्याच्या वेळची हाताची स्थिती, स्पर्शज्ञानाने घेत असलेला पकडीचा मागोवा आणि शून्य नजर इ.


यावरून स्पष्ट होते की, चित्रकार हा फक्त चित्रकारच असून चालत नाहीत. तर त्याला साहित्यिक दृष्टिकोनही असायला हवा. विनोदबुद्धी हवी. अवतीभोवतीच्या घडामोडी मार्जार प्रवृत्तीने न्याहाळण्याची प्रवृत्ती असायला पाहिजे.

कल्पक बुद्धीच्या जोरावर तो चित्राला साजेल अशा, वस्तुस्थितीचा आभास निर्माण करणारे, विषयाला अपेक्षित आशयाचे चित्रण करू शकतो. हे म्हणावे तितके सोपे नाही. त्यासाठी आपणास जे व्यंगचित्र (कार्टून) काढावयाचे असेल ते, कमीतकमी रेषांच्या फटकाऱ्यात साकार व्हायला हवे. त्यासाठी त्यातील व्यक्तीची वेगवेगळ्या दृष्टिकोनातून, वेगवेगळ्या आवेशात, वेगवेगळ्या भावमुद्रेत प्रथम स्केचेस करून घ्यायला हवीत. त्यासाठी आपण फोटोग्राफचा देखील उपयोग करू शकता.

आपण बऱ्याच वेळा कलादालनात जाऊन वेगवेगळ्या चित्रकारांची वेगवेगळ्या शैलीतील चित्रे, प्रदर्शने पाहतो. काही चित्रकार तैलरंगात चित्रे काढतात, काही जण पेन्सिल शेडिंग, तर काही कोलाजात, जलरंग, पेस्टल्स् अशा नाना तऱ्हेच्या माध्यमाचा वापर करून चित्रे काढतात. बरेच चित्रकार एकाच विषयात आणि एकाच माध्यमात चित्रे काढताना आढळतात. कारण त्यांची ती एक खास शैली असते. रंगलेपनाची एक विशिष्ट पद्धती असते. त्याच्या त्या विशिष्ट शैलीनेच तो चित्रकार ओळखला जातो.

उदा. वास्तववादी चित्रकथा म्हटली की प्रताप मुळिकांचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. अमूर्त पेंटिंग्ज (मॉडर्न आर्ट) म्हटले की मुरली लाहोटी, एम. एफ. हुसेन, बालकथा चित्रे, आशयचित्रे (इलस्ट्रेशन्स) भैयासाहेब ओंकार, बिल्डिंग डिझाईन रवि परांजपे, पौराणिक पेंटिंग्ज एस. एम. पंडित, दलाल, राजा रविवर्मा, व्यक्तिचित्र (तैलरंग) गोपाळराव देऊसकर, निसर्गचित्रे पी. ए. धोंड, जॉन फर्नांडिस ही केवळ काही उदाहरणे. चित्रकाराची ओळख म्हणजे त्यांची चित्रेच.

आजच्या काळात चित्रकारांचा



कल हा बहुतांशी अमूर्तवादी (मॉडर्न आर्ट) चित्रणाकडेच झुकलेला दिसतो. त्यामुळे सर्वसामान्य प्रेक्षकाला चित्राचा अर्थ लावणे जरा अवघडच जाते. त्यासाठी प्रेक्षकांस रंगाचे, मांडणीचे (फॉर्म्स) ज्ञान असणे आवश्यक आहे. प्रेक्षकांस जरी वाटत असले की, इकडून तिकडे रंगाचे फटकारे मारले की झाले मॉडर्न पेंटिंग तयार! पण असे होत नाही. चित्रकार रंगाचा फटकारा मारतो असे आपल्याला वाटते. तथापि त्याने त्याबाबत खूप विचार केलेला असतो. त्यातूनच तो चित्राचा विषय आणि भाव प्रकट करत असतो. तो आशय समजावून घेण्याइतक्या तोडीचा समोरचा प्रेक्षक मात्र असला पाहिजे.

चित्रे काढणं तसं अवघड नाही. मनावर घेतलं तर सर्व काही होऊ शकतं. तुम्ही देखील पेपरवर किंवा कॅनव्हासवर पेंटिंग करून घराच्या भिंतीवर लावू शकता. त्यासाठी अजिंठ्यातल्या चित्रांची प्रतिकृती किंवा एखाद्या चित्रकाराच्या दुर्मिळ चित्रांची प्रतिकृती करून देखील घरात लावू शकता. अगदीच काही जमले नाही तर कॅनव्हासवर चार आडव्या आणि चार उभ्या किंवा वाकड्यातिकड्या रेषा मारा आणि रिकाम्या जागेत कोणतेही रंग भरा. पाहा बरं! झालं की नाही चित्र तयार. अशी खूप वर्तुळे, चौकोन, त्रिकोण किंवा त्यातच एखादा पानाफुलांचा आकार घेऊन देखील छान चित्र काढता येईल. घराच्या भिंती तयार पोस्टर्सनेच सजविल्या पाहिजेत असे नाही, तर तुमच्या चित्रांनी सजलेल्या भिंतीही आलेल्यांचे नक्कीच लक्ष वेधतील, तुम्हाला शाबासकी देतीलन आणि त्यातून उद्याचे मोठे चित्रकार घडतील याबद्दल मी निश्चितच आशावादी आहे!!!

●●

**– भास्कर सगर**

एफ/५, लुणावत कॉम्प्लेक्स, पुणे २९

## सुट्टीतील वर्ग

दिवाळीच्या सुट्टीत, ज्ञान प्रबोधिनीतर्फे, इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन कौशल्याचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहे. मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. स्वत:च स्वत:चा अभ्यास कसा करावा? याचे मार्गदर्शन या वर्गात केले जाईल. त्याचबरोबर वाचनकौशल्य श्रवणकौशल्य, स्मरणकौशल्य, टिपणकौशल्य, याविषयीही मुलांना मार्गदर्शन केले जाणार आहे. या वर्गांमध्ये, आधुनिक यंत्रे, प्रात्यक्षिके व सराव पाठ यांच्या साह्याने मार्गदर्शन केले जाईल.

दि. ३ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर ९७ दरम्यान, रोज दु. २ ते ५ या वेळात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत हे वर्ग होतील. वर्गासाठी रु. १५०/– शुल्क असेल नाव नोंदणीसाठी पत्ता:

**छात्र प्रबोधन कार्यालय**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०

☺

## किती सोपा उपाय

बाहेर जोरात पाऊस पडत असताना पोस्टमन आत आला.

**पोस्टमन –** हे घ्या आजी, तुमच्या मुलाचं पत्र.

**आजी –** काय हे ? एवढ्या पावसात कशाला आलात ? पोस्टाने नाही का पाठवायचं पत्र ?

*निसर्ग सुंदर सृष्टी शोभा, घेई ताबा नेत्रांचा, पशु–पक्षी, पाने–फुले हाच पाया चित्रांचा.*

# कविता पानोपानी

## अक्कणमाती चिक्कणमाती

अक्कणमाती चिक्कणमाती खळगा तो खणावा
अस्सा खळगा सुरेख बाई, रोप ते लावावं
अस्सं रोप सुरेख बाई, खतानं वाढवावं
अश्शी वाढ सुरेख बाई, पालवी ती दिसावी
अश्शी पालवी सुरेख बाई, फळं त्या धरावी
अश्शी फळं सुरेख बाई, मेवा त्या जाणावा
अस्सा मेवा सुरेख बाई, मैत्रिणी मिळवाव्या
अश्शा मैत्रिणी सुरेख बाई, मन ती जुळावी
अश्शी जुळणी सुरेख बाई, भांडणं विसरावी
(चाल बदलून)



भांडणे ती विसरून
एकोप्याने राहून
भुलाबाई खेळू या
भुलाबाई खेळू या

**– नीला रानडे, धुळे**

## मुलांनो !

आई–वडिलांचे ऐका, त्याला लागेना पैका।
आपापली स्वच्छ ठेवा जागा, शेजाऱ्यांशी स्नेहाने वागा।
थोरामोठ्यांचा करा आदर, गरिबांची करा कदर।
गुरुजनांचा ठेवा मान, शिकवण्याकडे लावा कान।
पाहिले ते मागू नका, वेळ फुकट घालवू नका।
ज्ञानाने होतो मानव मोठा, वयाने असे ना का छोटा।

**–नेहा रानडे**
(संस्कार हस्तलिखित,
प्रतिभा निकेतन हायस्कूल, नांदेड.)



## आता कोसळेल नभ!

आकाशाचं मन आलं, कसं ओथंबून ओथंबून।
काळे ढग सांगती हे, भूमी हुंगून हुंगून।।
आसुसल्या धरतीच्या, डोळ्यामध्ये आग आग।
आतां कोसळेल नभ, शांतवाया तगमग।।
धरतीचे पाते कसे, झाले मलूल मलूल।
माय श्वासातून सांगे, आली चाहूल चाहूल।।
कुंद झाल्या दिशा दिशा, वारं दाटलं दाटलं।
आतां येईल झुळूक, उगा वाटलं वाटलं।।
उभा मांडव अंधारे, गेला चौघडा झडून।
वीज लहरीची घेते, झेप चिडून चिडून।।
चाळ बांधून पानांचे, झाडे तिष्ठत तिष्ठत।
कधी मृगाचे व्हायचे, सुरू लळीत लळीत।।
लागे धरेला वणवा, धीर संपून संपून।
कधी वोळेल समुद्र, कशी वळून वळून।।
वादळाचे गाणे घुमे, ऊर फाडून फाडून।
नभ भिडे धरतीला, वेडं झोंबून झोंबून।।
आतां पावसाची गाणी, आली भिजून भिजून।
धरणीचे ओठ घेती, नभ पिऊन पिऊन।।
मनी गाणी पावसाची, चिंब भिजून भिजून।
ओठ धरणीचे घेती, नभ पिऊन पिऊन।।

**–रोहिणी रा. करंदीकर, पुणे**

# तिमिरातून प्रकाशाकडे

वर्षा कुलकर्णी

१५ ऑक्टोबर हा 'जागतिक अंधदिन' मानला जातो. आज आपल्याभोवती अनेक अंध व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रांत आत्मविश्वासाने वावरताना दिसतात. प्रथम मनात आलं, अशा एखाद्या अंध व्यक्तीच्या कर्तृत्वाचा परिचय करून द्यावा. मग वाटलं, ज्यांच्या नेत्रांपर्यंत प्रकाशाचे किरण पोहोचत नाहीत, अशांच्या मनात परिस्थितीवर मात करण्याची प्रेरणा जाग्या करणाऱ्या, त्याच्या हातात स्वप्नांची फुलं ठेवणाऱ्या व्यक्तींच्या कार्यामागची प्रेरणा जाणून घेतली तर? डोळ्यांसमोर एकदम नाव आलं ते अंधमित्र श्री. प्रभाकर भिडे यांचं. अंधांसाठी काम करताकरता ते एका अर्थाने त्यांचे नेत्र बनून मार्गदर्शक आधारस्तंभ कसे बनले याची हकीकत खूप काही सांगून जाणारी आहे. स्वत:ला ते सामान्य माणूस म्हणवतात; पण या सामान्यपणात दडलेले असामान्यत्व त्यांनी अंगिकारलेल्या कार्यात दिसते.

भिडेकाकांच्या अंध विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रे गाजविली आहेत. मिलिंद कसबेकर हा त्यांचा विद्यार्थी पीएच.डी. झालेला आहे, तर झोपडपट्टीत राहणारी अनिता पठाडे बी.ए., बी.एड. झाली आहे. या परीक्षांत अनिता ब्रेललिपीत पहिली आलेली आहे. श्रीरंग सहस्त्रबुद्धे आणि चंदन मोकाशी या विद्यार्थ्यांनाही चांगले यश मिळाले आहे.

स्वत: डोळस असूनही अंधांसाठी कार्य करावेसे वाटणे, यामागे कुणाची प्रेरणा असेल? कोणती कारणे असतील? हे कार्य करणे कसे जमत असेल? ते करत असताना कोणत्या अडचणी आल्या असतील? अशा प्रश्नांची यादी घेऊन



श्री. प्रभाकर भिडे

भिडेकाकांना भेटले. ८० वर्षांचे, पण वयाचा मागमूसही वागण्यात नसलेले, उत्साही, काहीतरी करायच्या प्रेरणेने भारलेले काका स्वागताला सामोरे आले. कुठल्याही प्रस्तावनेची गरज नव्हतीच. त्यामुळे सरळ प्रश्नांनाच सुरुवात केली आणि उत्तरांमधून एका वेगळ्याच व्यक्तिमत्वाची नव्याने ओळख झाली.

**''उदरनिर्वाहासाठी अनेक वर्षे धावपळीचे आयुष्य जगल्यावर निवृत्तीनंतर तरी आरामाचे, मुला–नातवंडामध्ये सुखासीन आयुष्य काढावे, अशी सर्वसाधारण कल्पना असते. पण निवृत्तीनंतर समाजकार्याकडे वळावे असे तुम्हाला का वाटले?''**

''सुरुवातीपासून मला अध्यात्माची आवड होती. मी पुण्यात असताना गणेशशास्त्री जोशींकडून, ज्ञानेश्वरी ऐकली आणि आपणही काहीतरी केले पाहिजे असे वाटू लागले. निवृत्तीनंतर मानवसेवा करायची असे पहिल्यापासून डोक्यात होतेच. ज्ञानेश्वरीतून मला दिशा मिळाली. त्यावेळी मी सचिवालयात गृहखात्यात नोकरी करत होता; परंतु तेथील साचेबंद, रुक्ष कामात माझे मन रमेना. कारण सतत दुसऱ्यासाठी काही करावेसे वाटायचे. या नोकरीत ते जमत नव्हते. त्यामुळे लवकर म्हणजेच वयाच्या ५५ व्या वर्षीच निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आणि १९७२ साली मी मुंबईहून पुण्याला आलो.''

समाजकार्य अनेक व्यक्ती करतात. मात्र ज्या समाजात आपण वाढलो, ज्या समाजाने आपल्याला माणूस म्हणून मान दिला, मोठे केले, त्या समाजाचे आपण काही देणे लागतो, अशा निरपेक्ष भावनेने समाजकार्य करणारे फार थोडे असतात. भिडेकाका या थोड्यांमध्ये मोडणारे आहेत असे मला वाटले.

**''समाजात हाता–पायाने अधू, मतिमंद, मूकबधिर असे इतरही अपंग असतात; पण अंध व्यक्तींसाठीच आपण कार्य करावे असे तुम्हाला का वाटले?''**

''तुम्ही म्हणता त्याप्रमाणे इतरही अनेक अपंग व्यक्ती समाजात असतात; पण अंध व्यक्ती ही सगळ्यात जास्त परावलंबी आणि वंचित वाटल्यानेच मी माझ्या समाजकार्यासाठी त्यांना अधिक प्राधान्य दिले. तसेच दुसरे एक कारण म्हणजे, अंधांसाठी कार्य करावे हे कदाचित फार पूर्वी माझ्या मनावर कोरले गेले असावे. मी मूळचा पुण्याचाच. त्यावेळी नू.म.वि. प्रशालेतून मी मॅट्रिक झालो होतो; पण पुढे कॉलेजशिक्षण न करता

मिलमध्ये नोकरी करून अनुभव घ्यावा, असा सल्ला माझ्या मेव्हण्यांनी दिला. त्याप्रमाणे मिलची नोकरी सुरू झाली. रात्रपाळी करावी लागे. त्यामुळे डोळ्यांवर ताण येऊन माझे डोळे बिघडले. एक डोळा तर निकामीच झाला. मग मात्र ती नोकरी मी सोडली. त्यामुळे कदाचित मला अंधांबद्दल जास्त सहानुभूती असेल.''

**''अंध व्यक्ती मूकबधिर नसल्यामुळे त्यांच्याशी संवाद साधणे अवघड नसते. पण ही व्यक्ती आपली आहे, आपल्याला मदत करण्याच्या हेतूने ही व्यक्ती आपले डोळे बनू बघत आहे, या दृष्टिकोनातून अंध व्यक्तींच्या मनात विश्वास निर्माण करण्याची सर्वप्रथम गरज असते. हे तुम्ही कसं केलंत?''**

''कुठल्याही अपंगामध्ये जिद्द निर्माण करणे हे महत्त्वाचे असते आणि त्यासाठी त्यांनी आपल्यावर विश्वास दाखवायला लागतो. म्हणूनच मी 'ब्रेल लिपी' म्हणजेच अंधांची लेखन-वाचनाची भाषा शिकून घेतली. अनिता पठारे या माझ्या विद्यार्थिनीकडूनच मी ब्रेललिपी शिकलो.''

**''उज्ज्वल भवितव्यासाठी जगाच्या पसाऱ्यात चाचपडणाऱ्या अंध विद्यार्थ्यांची काठी बनायचे कसे ठरविलेत?''**

''तसं सुरुवातीला मी नेत्रदानाचे कार्य केले. गणेशशास्त्रींच्या प्रवचनांच्या वेळी नेत्रदान मंडळाबद्दल ऐकले होते. मंडळात गेल्यावर नेत्रदानाचे महत्त्व कळले. विविध संस्था, शाळांमधून मी नेत्रदानावर व्याख्याने दिली. संस्थेकरिता शंभर नेत्रदाते मिळविले; पण हे काम करताना मनात यायचे की, मेलेल्याचे डोळे इतरांना गरजेप्रमाणे देणे हे महत्त्वाचे आहेच; पण आंधळ्यांचे जिवंतपणी डोळे बनणे हे खरे नेत्रदान! आणि अशाप्रकारे माझा 'अंधमित्र' हा प्रवास सुरु झाला.''

**''तुम्ही तुमचे विद्यार्थी मिळविलेत कसे? कारण असे अनेक अंध असतात; पण बहुतेकजण कुठल्यातरी संस्थेत जातात, शिकतात. तुमच्यावर त्यांनी विश्वास कसा ठेवला?''**

''एकदा दिशा सापडली की अनेक मार्ग पुढे दिसतात. मी ज्यांना शिकायची इच्छा आहे पण त्यात काही अडचणी येताहेत, अशा अंध व्यक्तींचा शोध घेतला. त्यात मिलिंद कसबेकरांचा पत्ता मिळाला. हा जिद्दी मुलगा अंध असूनही बी.ए. करीत होता. त्याची जिद्द बघून मी थक्कच झालो. जे शोधत होतो ते सापडले असे वाटले.''

काकांनी मिलिंदला मानसिक, शारीरिक आणि आर्थिक मदतही केली. आणि मग बी.ए., एम.ए. असा तो पुढे जातच राहिला. त्याने पीएच.डी. करायचे ठरविल्यावरही काकांनी त्याला प्रोत्साहन दिले. त्याच्यासाठी संदर्भ धुंडाळले, वाचन केले, नोट्स काढल्या आणि मिलिंदचे डोळे बनून त्याला प्रत्येक अडथळ्याच्या शर्यतीतून पार केले. पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळविणारे कसबेकर हे पहिलेच अंध विद्यार्थी ठरले. काकांचे कार्य इथेच थांबले नाही तर मिलिंदप्रमाणेच ते अनेकांची काठी बनले. मात्र यासाठी इतर संस्थांची मदत किंवा शासनाचे सहकार्य काकांनी घेतलेले नाही. या बाबतीतले त्यांचे अनुभव फारसे चांगले नाहीत. उलट स्वत:च्याच पुंजीतून त या विद्यार्थ्यांना मदत करत राहिले. मुख्य म्हणजे त्यांच्या कार्याला त्यांच्या घरच्यांचे पूर्ण सहकार्य आहे. त्यांच्या पत्नी त्यांना या कामात मदत करतात व त्यांच्या मुलांचाही या कार्याला पाठिंबा आहे. संस्थात्मक कार्यावर काकांचा कमी विश्वास आहे. संस्थेत काम करणारे बरेचजण लोकेषणा (प्रसिद्धी) व वित्तेषणा (पैसा) यासाठी कार्य करतात असे त्यांचे मत आहे. निरपेक्ष वृत्तीने काम करणारे फार थोडे असतात. त्यामुळे काकांनी सर्व कार्यव्यक्तिगत पातळीवर करायचे ठरविले. कुठेही आग्रह न करता, हात न पसरता, निरपेक्ष वृत्तीने जे देतील तेवढेच घेतले.

तरुणांना लाजवील अशा उत्साहाने कार्य करणाऱ्या काकांचे याबाबतचे गुपित जाणून घ्यायचे होते. त्याबाबत विचारता काकांनी सांगितले, ''सातत्य व परिश्रम यातून हे सगळे घडले. विचार कृतीत आणणे हे फार महत्त्वाचे असते. नुसते वाचन करून, विचार करून फलिताची अपेक्षा करणे चूक आहे. मला कार्य करायची प्रेरणा परमेश्वराच्या साक्षात्काराने झाली.'' भिडेकाकांच्या गुपिताप्रमाणे आपण सर्वांनीच अशा प्रकारचे कार्य केले पाहिजे. त्यांच्या कार्यातून आपणही प्रेरणा घेतली पाहिजे. त्यांच्यासारखा साक्षात्कार तुम्हा आम्हाला होवो, अशी आशा करून, अन् असेच कार्य करण्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करून त्यांचा निरोप घेतला.

●●

**– वर्षा कुलकर्णी**
२२ अ 'मैफल' ९१/२, शिक्षकनगर
कोथरुड, पुणे ३८

अभ्यासातील स्वावलंबन

# जरा कान देऊन ऐका!



एखादी गोष्ट चांगली समजण्यासाठी काही कौशल्यांचा विकास होण्याची गरज असते. श्रवणकौशल्य, वाचनकौशल्य, निरीक्षणकौशल्य, प्रश्नकौशल्य आणि योग्य वेळी आधीचे ज्ञान अचूक आठवण्याचे कौशल्य. ही कौशल्ये आत्मसात झाली तर आकलन व्हायला मदत होते. त्यापैकी वाचनकौशल्याचा विचार यापूर्वीच्या लेखांमध्ये आपण केला. श्रवणाची क्रिया आपण सतत करीत असतोच; परंतु ते जाणीवपूर्वक केलेले श्रवण नसते. या लेखामध्ये आकलनाला पूरक अशा श्रवणकौशल्याचा विचार करू या.

**श्रवणकौशल्य :** अक्षरओळख झाली म्हणजे उत्तम वाचता येते हे जसे खरे नाही, तसेच कानावर शब्द पडले म्हणजे श्रवणकौशल्य प्राप्त झाले हेही खरे नाही. दर क्षणाला आपल्या कानावर असंख्य आवाज आदळत असतात. या आवाजांमधले उपयोगी आवाज ऐकता येणे ते ओळखता येणे, त्यातील वाच्यार्थ व अर्भितार्थ समजणे, ऐकलेल्यातले सर्व काही समजणे, असे झाले म्हणजे नुसत्या ऐकण्यापेक्षा अधिक असे श्रवणकौशल्य प्राप्त होते.

आपल्याला विद्यार्थी म्हणून अभ्यासाच्या दृष्टीने काय काय ऐकावे लागते? वर्गात शिकवताना शिक्षक प्रामुख्याने कथनपद्धती वापरत असतात. त्यांनी केलेले कथन, स्पष्टीकरण आपल्याला ऐकावे लागते. या ऐकण्यातून आपण काही प्रमाणात शिकत असतो. काही वेळा एखाद्या विषयातील काही भाग मोठ्याने वाचतो, काही भाग मोठ्याने वाचून पाठ करत असतो, तेव्हा स्वत:चाच आवाज आपण ऐकत असतो. कधी कधी चर्चात्मक पद्धतीने अभ्यास करताना आपण मित्राचे म्हणणे ऐकत असतो, तर कधी दोन मित्रांमधील चर्चा त्रयस्थ म्हणून ऐकत असतो. कधी कधी चर्चात्मक पद्धतीने अभ्यास करताना आपण मित्राचे म्हणणे ऐकत असतो, तर कधी दोन मित्रांमधील चर्चा त्रयस्थ म्हणून ऐकत असतो. अलीकडे टी.व्ही., रेडिओ यांसारख्या साधनांचा उपयोग इतका वाढला आहे की, ऐकण्यातला बराच वेळ या साधनांवरून प्रक्षेपित होणारे कार्यक्रम ऐकण्यात जात असतो. या साऱ्या ऐकण्यातून आपल्याला मजकुरातील अर्थ उलगडत जातो.

**श्रवणाचे महत्त्वाचे घटक:**

ऐकताना लक्ष नसेल तर शब्द कानांत शिरतात पण त्यांची नोंद मेंदूत होत नाही. म्हणजे ऐकून न ऐकल्यासारखेच झाले. त्यामुळे **अवधान अथवा लक्ष हा श्रवणातला पहिला महत्त्वाचा घटक** आहे.

ऐकलेला आवाज ओळखीचा असेल तर ती ओळख आपल्याला आठवली पाहिजे. परकी भाषा आपल्याला ऐकू येत असते; पण त्यातील शब्द अनोळखी असतात. त्यामुळे शब्द कानावर पडले तरी त्याकडे दुर्लक्ष हाते. याउलट परक्या प्रदेशात आपल्याला येत असलेल्या भाषेतला एक जरी शब्द कानी पडला तरी कान टवकारले जातात. वर्गात शिक्षकांचे कथन ऐकताना देखील असे घडू शकते. शास्त्रासारख्या विषयात नेहमीच्या बोलीभाषेपेक्षा वेगळी भाषा वापरलेली असते. तेथे पाऊस न म्हणता पर्जन्य म्हटलेले असते. झीज व भर न म्हणता क्षरण व निक्षेपण म्हटलेले असते. असे विशिष्ट शब्द भाषणात असतील तर श्रवणाद्वारे होणारे आकलन कमी होते. त्यामुळे **शब्दओळख ध्वनीओळख हा श्रवणातला दुसरा महत्त्वाचा घटक** आहे.

**श्रवणाची गती** हा **तिसरा घटक** आहे. बोलणारा ज्या वेगाने बोलत असतो त्या वेगाने ऐकता आले पाहिजे. त्या वेगाने बोलण्यातला अर्थ उलगडत गेला पाहिजे. जर या दोन गतींमध्ये समन्वय साधला गेला नाही, तर श्रवणात तुटकपणा येतो. मधलेमधले दुवे निसटून जातात. परिणामत: संकलित आकलन अपुरे



किंवा चुकीचे होते.

**श्रवणातला चवथा** व शेवटचा **घटक आकलन** हा आहे. त्यासंबंधी पुरेशी चर्चा आपण नंतरच्या भागात करणार आहोत.

**श्रवणकौशल्य वाढविण्याचे उपाय:**

१) एकाग्र चित्ताने ऐकण्याचा प्रयत्न करणे. यासाठी ऐकत असताना अन्य ज्ञानेंद्रिये बंद करता आली पाहिजेत. हातांनी काही चाळा चाललेला आहे, स्वयंपाकघरातून कोणते वास येताहेत इकडे लक्ष जाते आहे. असे व्हायला नको असेल, तर ऐकताना डोळे बंद करावेत. हात मांडीवर स्थिर ठेवावेत व स्थिर शरीर करून ऐकावे... ऐकत असताना त्या मजकुराचे कल्पनाचित्र डोळ्यांसमोर आणण्याचा प्रयत्न करावा.

२) बऱ्याचदा ऐकण्याचा पुरेसा सराव नसल्याने भरभर बोलणे किंवा वेगळे उच्चार असलेले भाषण समजत नाही. यासाठी भरभर बोलणाऱ्या व्यक्तीचे बोलणे वारंवार ऐकले पाहिजे. संदर्भावरून त्याचा अर्थ जाणून घेऊन तो बोलणाऱ्याला सांगावा व आपण ऐकले तेच बोलणाऱ्याला म्हणायचे होते ना? याची खात्री करून घ्यावी.

३) मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधल्या कॅसेट्स मुद्दाम ऐकाव्यात, ती ती भाषा, मातृभाषा असणाऱ्या व्यक्तींच्या उच्चारातील बारकावे समजून घ्यावेत.


४) वर्गात शिकताना श्रवण, वाचन, लेखन इ. अनेक क्रिया आपल्याला कराव्या लागतात. ऐकताऐकता टिपणे घेणे जमत नाही. त्यामुळे सुरुवातीला एकावेळी एकच क्रिया करावी. लक्षपूर्वक ऐकून नंतर घरी आल्यावर टिपणे काढावीत. लक्षपूर्वक सहज ऐकता यायला लागल्यावर टिपणे घेण्याचा प्रयत्न करावा. त्यातही सुरुवातीला काही शब्दच फक्त नोंदवावे. लेखनापेक्षा श्रवणावरच चित्त एकाग्र करावे.

५) ऐकण्यापूर्वी वक्त्याबद्दल, विषयाबद्दल कोणतेही पूर्वग्रह नकोत. नाहीतर बोलणाऱ्याला काही वेगळेच म्हणायचे असते व आपण ते आपल्याच दृष्टिकोनातून ऐकतो त्यामुळे यथार्थ आकलन होत नाही.

६) बऱ्याच जणांना अशी सवय असते की, ऐकत असताना त्यांच्या मनात बोलण्यातील मुद्द्यांवरची प्रतिक्रिया उमटत राहते. लगेच प्रतिक्रिया उमटली की पुढे त्याचाच विचार होत राहतो त्यामुळे बोलणाऱ्याचे बोलणे कानाआडच राहते. यासाठी प्रयत्न कसा करा की बोलणाऱ्याचे बोलणे पूर्व होण्याची वाट पहा, मग काही क्षण विचार करून त्यावर प्रतिक्रिया द्या.

७) ऐकत असताना समोरच्याला प्रतिसाद देणे आवश्यक असते. हा प्रतिसाद आपल्या चेहऱ्यावरून देता येतो. एखादी गोष्ट समजली, आवडली तर चेहऱ्यावर स्मित आणून, होकारार्थी मान हालवून प्रतिसाद द्या. जर एखादी गोष्ट समजत नसेल तर चेहरा प्रश्नार्थक करा, म्हणजे बोलणारा त्या गोष्टीचे आणखी स्पष्टीकरण करेल, नवीन गोष्ट जाणून घेण्याची उत्सुकता तुमच्या डोळ्यात दिसू द्या. म्हणजे बोलणाराही समरसून बोलेल व श्रोता व वक्ता हे काम तुम्हाला जाणीवपूर्वक करावे लागेल; पण नंतर ते सहज व्हायला लागेल.

८) रेडिओ व दूरदर्शनवरील मराठी, हिंदी, इंग्रजी बातम्या आवर्जून ऐका. त्यातून तुमचे श्रवणकौशल्य नक्कीच वाढेल. नव्या शब्दांचा परिचय होईल. बातम्या ऐकणे म्हणजे अभ्यास करणे आहे असेच समजा. ●●



**प्रा. विवेक पोंक्षे**
रघुराज सोसायटी,
पुणे - सिंहगड रस्ता, पुणे ३०

# सण–उत्सवांचे नाते आमच्याशी!


–चारूता पुराणिक

भारतीय संस्कृतीमध्ये सण वा उत्सव यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. आपले पूर्वज 'नित्य नवा दिस जागृतीचा'या भावनेनेच दिनक्रमाची आखणी करत असे आढळते. दिनचर्येचा एक भाग म्हणूनच विविध उपचार व धार्मिक विधी केले जात. बदलणारे ऋतु व त्याविषयीची कृतज्ञता यातून, पूजन, चिंतन, समारंभ होत असत. कालमानानुसार यात बदल होत गेले. अनेक नव्या पद्धती, कृतींची भरही पडत गेली. पण उत्सव यांच्यातील चिरंतनत्वाचे काय कारण असावे?

मनुष्य उत्सवप्रिय असतो. एकत्रित आनंद साजरा करण्याची त्याची मूळ वृत्ती आहे. सणातून आपल्या पूर्वपिढीने घालून दिलेल्या परंपरा, ठेवा जपण्याचे समाधान असते. सण का साजरे होऊ लागले? याचे महत्त्वही प्रत्येक पिढीला समजत राहते. संस्कारातील ताजेपण टिकविण्यासाठी सण–उत्सव उपयुक्त ठरतात. बदलत्या ऋतूनुसार येणाऱ्या सणांमुळे ऋतूंची ओळख होते. आपल्या कोणत्याही सणांमध्ये दु:ख, निराशा, परभूतता यांना जागाच नाही. आनंद व विसावा योग्य तऱ्हेने घेण्याचे वळण व शिस्त, सण शिकवीत असतात.

भरगच्च सणावारांनी पूर्ण असा हिरवा श्रावण आणि श्रीगणेशांच्या आगमन–आरतीत संपलेला भाद्रपद व त्यापाठोपाठ नवरात्राच्या प्रारंभाने 'विजयादशमीची' चाहूल लागते आश्विन शुक्ल दशमी ही तिथी. पक्वान्ने खाऊन, खरेदी करून व नवे कपडे घालून आपट्याची पाने वाटणे एवढाच मर्यादित अर्थ दसऱ्याचा नाही. हा शौर्य व पराक्रमाच्या स्मरणाचा दिवस! आश्विन शुक्ल दशमीला घडलेल्या अनेक वीरकथांमुळे ह्या दिवसाचे महत्त्व विशेष आहे. नऊ प्रकारचे धान्य पेरून, मनुष्य निर्वाहापुरते मिळवू लागला. ती आठवण म्हणून 'कृषिमहोत्सव' सुरू झाला. शेतकरी जी जमीन पिकवितो, तिचे रक्षण करायलाही तो बाहेर पडतो. स्वदेशरक्षणासाठी, स्वत:च्या देशाची हद्द, सीमा, ओलांडून शत्रूच्या भूमीत लढणे हा क्षात्रधर्म. सीमोल्लंघनामुळे 'क्षात्रमहोत्सव'सुरू झाला. सरस्वतीपूजा अर्थात विद्यारंभ म्हणून लहान मुलांना पाटीपूजन करण्यास सांगितले जाते. शस्त्र, विद्या, धान्य या जीवनोपयोगी तत्त्वांच पूजन यातून कृतज्ञतेची भावना शिकणे आवश्यक आहे. क्षत्रियांनी परमुलखातून लुटून आणलेले धन आपल्या लोकांना वाटून देण्याचा संबंधही दसऱ्याशी जोडलेला आहे. पुराणात एक कथा आहे, रघुराजाने खंडणी देण्यासाठी देवांनी शमीच्या झाडावर सुवर्णमुद्रांची वृष्टी केली. रघुराजाने कौत्सवाला ते सुवर्ण दान केले. कौत्साने त्याला आवश्यक तेवढ्या सुवर्णमुद्रा घेऊन बाकीच्या नगरवासीयांना दिल्या. तो दिवस आश्विन शुक्ल दशमी. म्हणून आजही शमीचे पूजन करून त्याची









पाने सोने समजून लुटतात. श्रीरामचंद्रांनी रावणावर स्वारी केली, ती विजयादशमीच्या मुहूर्तावर. एकूणच अनेक स्वाऱ्या व त्यांचे यश, विजय यामुळे हा दिवस राष्ट्रीय विजयाचा मुहूर्त किंवा सण झाला आहे. शमीप्रमाणे अश्मंतक म्हणजे आपट्याच्या झाडाची पानेही सोने म्हणून लुटतात.

दसऱ्यापर्यंत पावसाळा संपलेला असतो. वातावरण स्वच्छ, प्रसन्न असते. आश्विनाचे सोनेरी ऊन, झेंडूची केशरी-पिवळी फुले, शेवंतीचा तजेला असे कणाकणाने रूपसौंदर्य वाढविणारे निसर्गचित्र म्हणजे दसऱ्याभोवतीचे वातावरण असते. निसर्गाच्या प्रफुल्लतेमुळेच माणसांच्या वृत्तीही आनंदित असतात. अशा वेळी पराक्रमाचे स्फुरण हे असणारच. दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या पूर्वजांनी सीमेच्या रक्षणासाठी सरहद्द ओलांडली.

दसऱ्याचे सीमोल्लंघन किंवा शस्त्रास्त्रांची पूजा यात शौर्याची भावना आहे. केवळ शौर्यगीते वा शस्त्रपूजा आता पुरेशी नाही. देशाच्या सीमा रक्षणासाठी अहोरात्र शस्त्रसिद्ध सेनेच्या कुटुंबियांसाठी या दिवसाला काय करता येईल? शुभेच्छापत्रे किंवा प्रत्यक्ष भेटून त्यांना सहकार्य करता येईल का? किंवा सेनेच्या कुटुंबांसाठी सारा देश आहे. ही एकसंघत्वाची भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवी. आपली संरक्षण पद्धती यावर अभ्यास-चर्चा व्हायला हव्यात. यातून सणाला अर्थपूर्ण नवे रूप मिळेल.

दसऱ्यापाठोपाठ चांदणे शिंपीत येणारी कोजागिरी पौर्णिमा म्हणजे रंग, रूप, स्पर्श गंधाचा उत्सव! शरद ऋतूतील रात्री असलेले हे धवल, टिपूर चांदणे कोणाला आकर्षित करणार नाही? निसर्ग भरभरून देतोय, चंद्रफुलांची उधळण होत असताना आपली ओंजळ रिक्त ठेवून कसे चालेल? ती शीतलता अनुभवायला शिकायलाच हवे. आपल्या मित्र-मैत्रिणी, कुटुंबियांसह चांदण्यांचा सौंदर्य-सोहळा पाहायलाच हवा. एका कोजागिरीला गणपतिपुळ्याच्या समुद्रकिनाऱ्यावरून फिरताना फेसाळणाऱ्या लाटांमुळे उधाण आलेला दर्या आणि शुभ्र चांदण्यांनी भरगच्च निरभ्र आकाश याचा आनंद मनमुराद लुटला होता. पर्वती, सिंहगड या टेकड्या-डोंगर चांदण्यात चढण्यातील मजा अपूर्व असते. स्वच्छ आकाशामुळे चंद्र स्पष्ट दिसतो. ऋतूतील बदल म्हणजे पाऊस संपलेलाच असतो. या दिवशी घर, रस्ते, स्वच्छ, सुशोभित करून दाराजवळ अग्नी प्रदिप्त करून त्याची पूजा करायची. ती दूध व खिरीने करतात. ऑक्टोबर महिन्यातील उष्णतापमानाचा त्रास होऊ नये, पित्तासारखे विकार दूर राहावेत, या हेतूने चांदण्यात तापविलेले, साखरयुक्त आटीव दूध पितात. पौर्णिमेची रात्र चांदण्यांच्या सुषमेकरिता जागवायची. इतर कोणत्याही पौर्णिमेपेक्षा ह्या पौर्णिमेचे तेज व शीतलता अधिक असते.

चंद्राच्या साक्षीने, आई मोठ्या मुलाला, त्याच्या दीर्घायुष्यासाठी ओवाळते. लक्ष्मीचा सर्वत्र वावर या रात्री असतो. लक्ष्मी म्हणजे निसर्गाची शोभा. ती अनुभवण्याइतकी रसिकता असणे हा लक्ष्मीचा वरदहस्तच

मानावा लागेल. वैदिक ब्राह्मणांकडून मंत्रजागर करण्याची पूर्वी पद्धत होती. आजही शुद्ध, स्वच्छ, उच्चारात संस्कृत श्लोक, मंत्रपठण करून, चांगल्या प्रथांची जपणूक करता येईल. तसेच उत्तम गीत-गायनाची, निसर्गाच्या सान्निध्यात आनंद घेता येईल.

आकाशीचे दीपच भूमीवर अवतरले असे वाटावे, ते दिवस म्हणजे दीपावलीचा सण. थंडी-धुक्यात, सुगंधी उटणे शरीराला लावून, अभ्यंगस्नान करून या दिवसाचे स्वागत होते. आश्विन वद्य त्रयोदशीपासून ते कार्तिक शुद्ध द्वितियेपर्यंत दिवाळी साजरी करतात. धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व यमद्वितीया-भाऊबीज यांचा समावेश दिवाळीत असतो. दिवाळीच्या प्रारंभी वसुबारस साजरी करतात. यात गाईविषयीची कृतज्ञता, सवत्स धेनूच्या पूजेने व्यक्त करतात. आता नुसती पूजा पुरेशी नाही. गाईची उत्तम निगा, दुग्धव्यवसाय याचा विचार आवश्यक आहे.

दिवाळीच्या प्रत्येक दिवसाबद्दल अनेक कथा आहेत. लक्ष्मीचे वास्तव्य, दीपांची तेजोमयता, रांगोळी यांचा हा सण, घरदार साफ करून लक्ष्मीच्या स्वागताची तयारी होते. आकाशदिवे, तोरणे यांनी सुशोभन केले जाले. नरकासुराचा-अर्थातच अस्वच्छता, दुष्ट प्रवृत्ती नाहीशा करून, आरोग्य व स्वास्थ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास दिवाळीचा दिवस सत्कारणी लागेल. लक्ष्मीपूजनाला लक्ष्मीची पूजा असते. व्यापारी त्यांच्या जमाखर्चाच्या वह्या, दुकानातील गल्ला यांची पूजा करतात. गुजरातमध्ये महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वतीची तर बंगालमध्ये कालीची पूजा करतात. बलिप्रतिपदा हा दिवाळीतील तिसरा दीप. दिवाळीनंतर नवे वर्ष सुरू होऊन नवे धान्य घरी येते. या दिवशी जेवणापूर्वी कडू फळाचा रस चाखण्याची प्रथा आहे. कारण आपण गोड-तिखट खातो, पण कडूपणाही कळायला हवा. भाऊबीजेला बहीण भावाला ओवाळते. त्यांच्या मायेला दृढ करणारा असा हा दिवस आहे.

फटाके, आतशबाजी, गोडधोड या बरोबरच, ज्यांना या गोष्टी अशक्य आहेत, त्यांना यातील काही अंश देण्याची भावना आपल्या आनंदाबरोबर असायला हवी. 'दुरितांचे तिमिर जावो' ज्ञानेश्वरांच्या या उक्तीचे स्मरण व तशी कृती करणे म्हणजे समाजाशी असलेले नाते अतूट करणे ठरेल.

भारतीय संस्कृतीचे संवर्धन करणारे सण-उत्सव समाजाच्या संघटनासाठी उपयुक्त ठरणे हे पूर्वीपेक्षा जास्त गरजेचे आहे. सणांमागील हेतू पाहिले तर त्यात आधुनिक विज्ञान, संशोधनाची बीजे आढळतात. आरोग्यासाठी, धन्वंतरी या स्वास्थ्यदेवतेचे पूजन करून धनत्रयोदशी साजरी करायची, म्हणजे आपल्या स्वास्थ्याचा, प्रकृतीचा अभ्यासच आहे. गाई-वासरांची पूजा, कोजागिरीची शोभा किंवा आपट्याची पाने असोत, यातून निसर्ग व मनुष्य यांच्या परस्पर नात्यांचाच गोफ विणला आहे. पर्यावरण, मानवी मन व चंद्र या सर्वांचा विचार व स्मृती करण्याची दिवस म्हणजेच सर्व सण-




उत्सव आहेत.

कुटुंब व समाज यातील बांधिलकी, आपलेपणा व्यक्त करण्यासाठीच एकमेकांना शुभेच्छा, भेटवस्तू मिष्टान्न देणे या रिती आपण पाळतो. केवळ मनोरंजन अथवा सुट्टी म्हणून आळसात वेळ घालवणे ही भूमिका विसरून, काही संकल्प करून, तो सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करणं, सर्वांना बरोबर घेणं म्हणजे हे सण साजरे करणे आहे. ही कृती पूर्ण होण्यासाठी त्यातील उपयुक्तता जाणून, त्यानुसार शक्ती संपादन करणे, आहार, विहार यांचे संयमन करणे या गोष्टी करून आपण सणांची परंपरा टिकवू या!

●●

**चारुता पुराणिक**
N /11, स्वा. सावरकर नगर,
माणिकबाग, सिंहगड पथ, पुणे ५१.

# स्पिन बॉलरचा चेंडू वळण्याचे कारण काय?




कोणताही देश आपली क्रिकेटची टीम निवडताना त्यामध्ये दोन-तीन स्पिन बॉलर्सचा हमखास समावेश करतो. बहुतेक वेळा स्पिन बॉलर्स फास्ट बॉलर्सपेक्षा जास्त विकेट घेतात. वस्तुत: स्पिन बोलरने फेकलेला चेंडू फारसा गतिमान नसतो; पण तो नेमका कोणत्या दिशेने येईल



हेच बॅटस्‌मनच्या लक्षात येत नाही. यष्टीच्या बराच बाहेरून जाणारा चेंडू अचानक यष्टीच्या दिशेत वळतो आणि समोरच्या बॅटस्‌मनला चकवितो. बॅटस्‌मनचा त्रिफळा उडाल्यानंतरच आपण बाद झाल्याचे त्याच्या लक्षात येते.

फिरकी घेत गतिमान असणारा चेंडू हवेच्या प्रवाहाची दिशा बदलू शकतो. तसे फिरकी घेणाऱ्या चेंडूच्या पृष्ठभागाचा हवेशी संपर्क आल्यामुळे घर्षण निर्माण होते आणि पृष्ठभागाजवळील हवेचा प्रवाह बाह्यप्रवाहापासून अलग होतो. त्यामुळे पृष्ठभागाजवळ कमी दाबाचा प्रदेश निर्माण होतो. फिरकी घेत गतिमान असणाऱ्या चेंडूचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, चेंडूची एक बाजू हवेच्या प्रवाहाच्या दिशेत तर दुसरी बाजू त्याच्या विरूद्ध दिशेत गतिमान असते. चेंडूची जी बाजू हवेच्या दिशेत गतिमान असते त्या बाजूची हवा पृष्ठभागाबरोबर खेचली जाते व पृष्ठभागाजवळील हवा चेंडूपासून जास्त अंतरावर बाह्य हवेपासून अलग होते. याउलट विरुद्ध दिशेत गतिमान असणाऱ्या बाजूकडील हवा चेंडूपासून कमी अंतरावर बाह्य हवेपासून विलग होते. अशाप्रकारे चेंडूच्या विरुद्ध बाजूंवर असमानता निर्माण होऊन हवेचा प्रवाह एका बाजूला जास्त प्रमाणात विचलित होतो. त्याची प्रतिक्रिया म्हणून त्याच्या विरुद्ध दिशेला एक बल निर्माण होते. या बलाची दिशा व तीव्रता, चेंडू किती प्रमाणात फिरकी घेतो यावर अवलंबून असते. फिरकीमुळे चेंडूवर निर्माण होणाऱ्या या बलाला 'मॅग्नुसचा परिणाम' असे नाव आहे. या बलामुळच चेंडूला योग्य दिशेत फिरकी दिली तर तो आपल्या गतीची दिशा बदलतो. क्रिकेटच्या खेळातील कुशल फिरकी बोलर याच तत्त्वाचा उपयोग करून चेंडूला विविध दिशेतून व कोनातून गतिमान करू शकतो.

जमिनीला समांतर फेकलेला चेंडू गुरुत्वाकर्षणामुळे हळूहळू जमिनीच्या दिशेत वळतो हे आपणास माहीत आहेच. फिरकी न घेणारा चेंडू एका विशिष्ट ठिकाणी यष्टीवर आपटणार असेल तर हे अंतर कमी किंवा जास्त करण्याची किमयाही फिरकी बोलरला करता येते. चेंडूची फिरकी बॅटस्‌मनच्या दिशेत असेल तर त्यावरील फिरकीमुळे निर्माण होणारे बल जमिनीच्या वरच्या दिशेत कार्य करते व चेंडू थोडा वर उचलला जातो. या प्रकारामध्ये चेंडू फारसा वर उसळला नसला तरी समोरच्या बॅटस्‌मनला मात्र तसा भास होतो.



●●

**(मला उत्तर हवंय!**


ल. मोहन आपटे यांच्या पुस्तकातून साभार)



*नव शस्त्रास्त्रे ही सुसज्ज असता जेथे, यश पर्जन्याची वृष्टि होई सर्वदा तेथे.*

## विजय कुवळेकर
# एक बहुरंगी व्यक्तिमत्त्व




'विजय कुवळेकर' हे नाव तसं तुम्हाआम्हा सर्वांनाच चांगलं परिचयाचं आहे. आपल्यापैकी बऱ्याच जणांची सकाळ त्यांच्या 'सकाळ'नेच होत असेल. काहींना ते त्यांच्या पुस्तकांमुळे 'लेखक' म्हणून परिचित असतील आणि अनेक पारितोषिके मिळविणाऱ्या त्यांच्या 'रावसाहेब' या चित्रपटामुळे तर ते सर्वांना अधिक परिचित झाले आहेत. 'रावसाहेब'या चित्रपटासाठी श्री. कुवळेकर यांना उत्कृष्ट कथा, पटकथा, संवाद आणि गीते अशी राज्यसरकारची चार पारितोषिके मिळाली आहेत. मात्र या क्षेत्रात येण्यापूर्वीपासूनच श्री. कुवळेकर पत्रकारितेचे क्षेत्र गाजवत आहेत. कोल्हापूर येथील एका प्रसिद्ध दैनिकात पत्रकारितेचा अनुभव घेऊन कुवळेकरांनी पुण्यात पाऊल ठेवले आणि 'सकाळ' –सारख्या प्रसिद्ध दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी पुण्यात जणू एक वैचारिक चळवळच उभी केली. 'सकाळ'चा चेहरामोहरा त्यांनी समाजाभिमुख केला. पत्रकार, लेखक, कवी आणि पटकथाकार अशा विविध क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविणाऱ्या श्री. कुवळेकरांची आवर्जून भेट घेतली आणि त्यातून सामाजिक जाणिवेचे भान ठेवून या चारही क्षेत्रांत सतत कार्यरत असणाऱ्या श्री. कुवळेकरांचे बहुरंगी व्यक्तित्व समोर आले.

**''समाज प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी पत्रकारितेचेच क्षेत्र निवडावेसे का वाटले?''**

''भारतासारख्या विकसनशील देशात वृत्तपत्रांचे काम हे केवळ माहिती पुरविणारं असून चालत नाही, तर त्या पलीकडे जाऊन जनजागरण, लोकांचे मनोरंजन आणि सामाजिक न्यायासाठीचं व्यासपीठ अशा स्वरूपात ते असावं लागतं. अशा रीतीने कार्य करताना सर्वसामान्यांशी दररोज संवाद/संपर्क साधणे महत्त्वाचे असते. त्या दृष्टीने पत्रकारितेचे क्षेत्र निवडले आणि या भूमिकेतूनच 'सकाळ'च्या प्रगतीसाठी प्रयत्न केले.''

'सकाळ'चे संपादक म्हणून काम करताना अनेक नामवंत लेखक, कलाकार, विद्वान, अर्थतज्ज्ञ, पत्रकार यांना श्री कुवळेकर यांनी लिहिते केले. मनोरंजनाबरोबरच वैचारिक आणि अभ्यासपूर्ण लेख, बातम्या, 'सकाळ' मधून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विविध विषयांवर आपली परखड मते त्यांनी अग्रलेखातून मांडली. 'घाणेरीची फुलं'सारख्या सदरातून समाजातील उपेक्षित, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कष्टकरी मुलांच्या जीवनकथा, 'जगणं म्हणजे' या सदरात सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय अशा कष्टकरी स्त्रियांच्या मुलाखती, 'पाण्यासाठी दाही दिशा'मध्ये पाण्याच्या दुर्भिक्ष्याची समस्या हाताळली, यातून श्री कुवळेवर यांनी ठेवलेले सामाजिक जाणिवेचे भान लक्षात येते.

'सकाळ'च्या प्रगतीचे टप्पे सांगताना श्री. कुवळेकर म्हणाले, ''एकूणच वृत्तपत्र हा समाजाचा केवळ आरसा असून चालणार नाही, काय घडले हे सांगण्याबरोबरच काय घडायला हवे हेही त्याने मांडले पाहिजे. ही माझी भूमिका आहे. त्या भूमिकेतून 'सकाळ'साठी अनेक नवीन सदरे सुरू केली. त्याचबरोबर 'विज्ञान, कला, क्रीडा' या पुरवण्याही सुरू केल्या. 'सुट्टीचे पान'सारखा अभिनव प्रयोग करीत असताना मुलांचा सर्वांगीण विकास नजरेसमोर ठेऊन अंकाचे वैविध्य

वाढविले.'' यातून संपादक या नात्याने श्री. कुवळेकर यांची कुशलताच दिसून येते.

मराठी भाषेविषयीचा सार्थ अभिमान ते आपल्या भूमिकेत मांडतात. ''इंग्रजी ही जरी जागतिक संवादाची भाषा असली तरी प्रादेशिक भाषा ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे उत्तम माध्यम आहे. त्यामुळेच मराठीचा मला अभिमान आहे.''

पत्रकारितेबरोबरच साहित्यक्षेत्रातही श्री. कुवळेकर यांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. व्हिएतनाम युद्धाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचं वर्णन करणारे 'व्हिएतनामचा संघर्ष' हे पुस्तक, सकाळमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या ललित लेखांवरील 'पैलू' हे पुस्तक आणि 'एका आत्महत्यापंथाची अखेर' अशी विविध विषयांवरील तीन पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'दिशा उसवल्या'ही काव्यात्मक कादंबरी आणि कर्णाच्या जीवनावरील 'अर्घ्य'हा कवितासंग्रह त्यांनी लिहिला आहे. 'पूल' आणि 'रात्र सरेना' या नाटकात त्यांनी स्त्रीच्या मनातील अंतर्गत संघर्ष मांडायचा प्रयत्न केला आहे. त्यांचा 'शिवार'हा दीर्घकथांचा संग्रहही प्रसिद्ध झाला आहे. आपल्या साहित्यातून श्री. कुवळेकर यांनी हाताळलेल्या विषयांचे वैविध्य, तसेच विविध वाङ्मयप्रकारांचा केलेला समर्थ वापर यातून साहित्यिक म्हणूनही त्यांचे वेगळेपण जाणवते. श्री कुवळेकरांचा हा प्रवास पत्रकारिता आणि साहित्य अशी क्षेत्रे ओलांडता ओलांडता पटकथालेखनापर्यंत येऊन पोहोचतो. 'रावसाहेब'ने जरी त्यांना यशाच्या शिखरावर नेले असले, तरी याआधी त्यांनी 'सूत्रधार' या हिंदी आणि 'टक्कर' या मराठी चित्रपटांचे पटकथालेखनही केले आहे.

**''सतत वास्तव्याचे दर्शन घडविणाऱ्या पत्रकारितच्या क्षेत्रातून चित्रपटांसारख्या स्वप्नांच्या दुनियेकडे कसे वळलात?''**

''पत्रकारितेच्या व्यवसायामुळे अनेक क्षेत्रांशी माझा अगदी जवळून परिचय झालेला आहे. 'राजकारण' हे त्यांपैकीच एक! राजकारणामुळे सामान्य माणसाची कशी फसवणूक होते, त्याला 'बळीचा बकरा' कसे बनविले जाते, कर्तृत्ववान माणूस सत्ता-संपत्तीच्या मागे लागून मूल्ये हरवतो तेव्हा त्याचे आणि समाजाचेही नुकसान कसे होते! हे सगळे चित्रपटासारख्या दृश्यमाध्यमातून योग्य प्रकारे दाखविता येईल असे वाटल्याने हे माध्यम निवडले. मात्र वृत्तपत्राप्रमाणे सगळ्याच वास्तवाचे दर्शन चित्रपटातून घडविता येत नाही. त्यावरही मर्यादा असतात.''

**''पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव चित्रपटांच्या कथानकासाठी उपयोगी पडले का?''**

''निश्चितच! देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक घटना वृत्तपत्राच्या कार्यालयात टिपली जात असते. संत्तासंघर्ष, जीवघेणी सत्तास्पर्धा यांचे चक्रावून टाकणारे अनुभव येत असतात. आपल्या स्वार्थासाठी सर्व प्रकारची मूल्ये कशी पायदळी तुडवली जातात याचा पावलोपावली अनुभव येत असतो. या सर्वांतून मनाला जाणवलेली प्रचंड अस्वस्थता 'रावसाहेब'च्या कथेतून मांडायचा प्रयत्न केलेला आहे.''

'रावसाहेब'च्या कथेमागची भूमिका श्री. कुवळेकर मांडत होते. मात्र त्यांच्या पूर्वीच्या 'सूत्रधार' या चित्रपटातही हीच भूमिका दिसते. जमीनदाराच्या जुलमी अत्याचाराविरूद्ध सळसळत्या रक्ताचा एक तरुण उभा ठाकतो आणि या लढ्यात यशस्वी झाल्यानंतर तो स्वत:ही जमीनदार बनून त्याच दुष्टचक्रात अडकतो. सत्तेच्या राजकारणातील हे चित्र अतिशय दाहकतेने 'सूत्रधार' मध्ये मांडले गेले होते.

**''चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद एकाच व्यक्तीने लिहिणे, याचा चित्रपटाच्या दर्जावर काही परिणाम होतो का?''**

''पटकथा लिहिणाऱ्याचीच कथा असेल तर त्याला कथेमागील आशय, उद्देश इ. सर्व अंगे ज्ञात असतात. त्यामुळे चित्रपट अधिक परिणामकारक होतो. सामान्यत: गीतकाराकडून प्रसंग सांगून गीते लिहवून घेतली जातात. रावसाहेबाची गीतेदेखील माझीच आहेत. गीतरचना करताना त्या त्या वेळचा प्रसंग, त्याचा हेतू मला पक्का ठाऊक होता. त्यामुळे गीतेही अधिक परिणामकारक होऊ शकतात.''

**''सध्याच्या चित्रपटांचे सवंग स्वरूप पाहता मुलांनी चित्रपटातून काय घ्यावे असे तुम्हाला वाटते?''**

''सर्वच चित्रपट पूर्णत: वाईट असतात असे नाही. एखाद्या चित्रपटाची कथा चांगली असते. काही वेळा छायाचित्रण उत्तम असते. कधी संवाद मार्मिक असतात. काही वेळा पार्श्वसंगिताचा योग्य वापर केलेला असतो. एकूणच, कथा, संवाद, संगीत, नृत्य, दिग्दर्शन, छायाचित्रण याकडे डोळसपणे पाहिल्यास चांगले

काय आणि वाईट काय? हे आपोआप समजू लागते.''

'रावसाहेब'च्या आठवणी सांगताना श्री कुवळेकर म्हणाले, ''अनेक अडचणीतून हा चित्रपट पूर्ण झाला. तरीही सदैव स्मरणात राहतील, असे काही सुखद अनुभवही आले आणि विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे चित्रपटाने पंधरा राज्यपुरस्कार मिळवले.''

**''या चित्रपटासाठी तुम्हाला वैयक्तिक चार पुरस्कार मिळाल्यावर कसं वाटतंय?''**

''अर्थातच आनंद वाटतो. मात्र पुरस्काराबरोबर त्याला लोकमान्यता मिळाल्याचा आनंद जास्त आहे. अतिशय महत्त्वाचे म्हणजे हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नाही. अनेकांचे सहकार्य मिळाल्यामुळे हे यश आज दिसते आहे. त्यात दिग्दर्शक संजय सूरकर यांचा वाटा मोठा आहे.''

श्री. कुवळेकर यांना पत्रकारिता, साहित्य, चित्रपट अशा विविध क्षेत्रांत यश मिळूनही त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होणारा निरहंकारीपणा मला विशेष भावत होता.

'अहंकाराचा वारा न लागो माझिया चित्ता.' याचे चालतेबोलते उदाहरण अनुभवल्याच्या आनंदात मी तिथून निघाले.

●●

**सुषमा निसळ**
स्टेट बँक कॉलनी, पर्वतीदर्शन, पुणे९

---

(पान ६ वरून पुढे चालू)

## *कथा 'स्वरमोहिनी'*

ध्वनिलहरी ऐकू येतात. यापेक्षा कमी किंवा जास्त कंपनसंख्या असणाऱ्या ध्वनिलहरींना श्रवणातील ध्वनिलहरींचा आपल्या शरीरावर परिणाम होऊ शकतो हे मी मागे वाचलेलं होतं. आज आम्ही कॉलेजमध्ये जाऊन मुद्दाम प्रा. शहाणेकाकांना भेटून विचारून घेतलं. त्यांच्याही मते श्रवणातीत ध्वनिलहरींच्यामुळे ऐकणाऱ्यावर अनिष्ट पणिाम होऊ शकतो!'' एवढे बोलून अप्पू जाफरकाकांकडे पाहू लागला.

त्याचे बोलणे कौतुकाने ऐकणारे जाफरकाका त्याला म्हणाले, ''ठीक आहे. हे सारे मला पटले; पण या साऱ्यांचा माझ्या गायनाशी काय संबंध? आम्ही शिकलो त्या श्राव्य सुरातच मला गाता येते ही उघड गोष्ट आहे. मग हा चमत्कार माझ्याकडून घडला कसा?''

एखाद्या रहस्याची अंतिम फोड करावी तशा आवालात अप्पू म्हणाला, ''चमत्कार घडत होता तो तुमच्याकडूनच; पण जाफरकाका तुमच्या गळ्यातून नव्हे, तर तुमच्या हातातून.''

''म्हणजे?'' आश्चर्याने बिट्टूच्या बाबांनी विचारले.

अप्पू म्हणाला, ''हा सारा स्वरमोहिनीचा चमत्कार! जाफरकाका तुमची लाडकी पेटी 'स्वरमोहिनी' म्हणजे काय? विद्युतप्रवाहाचं रूपांतर ध्वनिलहरीत करणारे एक यंत्र! गेल्या वर्षापर्यंत ती ठीक काम करीत होती; पण परवा जपानच्या दौऱ्यात तुम्ही तिच्यात काही दुरुस्ती करून घेतलीत ना! त्याचवेळी त्या दुरुस्त करणाऱ्या तंत्रज्ञांच्या हातून एखाद्या ''सर्किट'' मध्ये काहीतरी घडलं. त्यामुळे त्यानंतरच्या प्रत्येक कार्यक्रमात स्वरमोहिनीतून विशिष्ट दिशेने ध्वनिलहरी पसरू लागल्या आणि त्याचा परिणाम समोरच्या श्रोत्यांवर होऊ लागला.''

समाधानाने-खुषीने मान डोलावत जाफरकाका म्हणलो, ''तुझं सगळं बरोबर वाटतंय; पण अप्पू, जपानी तंत्रज्ञाच्या हातून निर्माण झालेला हा दोष तू काल दुरुस्त केलास कसा? अजून मॅट्रिक झाला नाहीस तू आणि एवढं...''

त्यांचे वाक्य मध्येच तोडून अप्पू म्हणाला, ''ते बिट्टू सांगेल, मूळ आयडिया बिट्टूची आणि कृती लिलीची.'' बिट्टू हसत म्हणाला, ''अहो काका! आम्हाला तो दोष कसा दुरूस्त करता येईल? किती विसरभोळे आहात तुम्ही! तुम्ही स्वरमोहिनी घेताना जोडी घेतली होतीत. एक तुमच्याकडे कार्यक्रमात आणि दुसरी बाबांजवळ आमच्या घरी. दोन्ही दिसायला अगदी सारख्या. कालच्या कार्यक्रमासाठी लिलीने गुपचूप तुमच्या स्वरमोहिनीऐवजी बाबांची स्वरमोहिनी आणून ठेवली. झाला की नाही आमचा प्लॅन यशस्वी!'' आश्चर्याने जाफरकाकांचे डोळे विस्फारले. पण लिली त्यांना चिडवत म्हणाली, ''पण जाफरकाका! मला एक कळले नाही, तुमची स्वरमोहिनी पेटी एवढी लाडकी आणि ती बदललेली तुमच्या लक्षातही येऊ नये? हेच तुमचं प्रेम...'' पण तिचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच तिची आई म्हणाली, ''लिली, जीभ जरा... ही तिन्ही पोरं म्हणजे...'' पण मध्येच मोठ्याने हसत तिन्ही पोरांना जवळ घेत जाफरकाका म्हणाले...

''ग्रेट आहेत.''

●●

**- एस. के. कुलकर्णी**
३१ भाग्यनगर, नांदेड

# ओळख राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेची (NCL)

**संकलन – स्वाती ढेकणे**

१९४७ ला आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचबरोबर देशात ज्या नवनवीन प्रयोगशाळा उभ्या केल्या त्यामध्ये राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा ही एक महत्त्वाची संस्था मानली जाते.

३ जानेवारी १९५० रोजी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या उद्‌घाटन समारंभात भाषण करताना पंडित नेहरू म्हणाले, ''देशाच्या विकासाचे भविष्य ठरविण्याच्या काळात या देशातील सरकारचे नेतृत्व करण्याचा मान मला मिळालेला आहे. अनेक तरुण आणि तरुणी या संशोधन प्रयोगशाळांमध्ये येऊन उत्साहाने संशोधन करीत आहेत आणि हा देश व येथील लोक यांच्या प्रगतीसाठी शास्त्राचा अभ्यास करीत आहेत, या दृश्याची कल्पनाच मला अतिशय रोमहर्षक वाटते!'' आज राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत संशोधनात मग्न असलेले शेकडो तरुण आणि तरुणी पाहताना पं. जवाहरलाल नेहरूंनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरले आहे याची जाणीव होते.

आजच्या या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगी या प्रयोगशाळेचा मागोवा घेण्यात आपणा सर्वांनाच आनंद वाटेल.

१९४१ साली शास्त्रीय आणि औद्योगिक संस्थेसाठी कौन्सिल नेमले गेले आणि त्याच्यासाठी योजनासमिती जुलै ४३ ला स्थापन झाली. तर शांतीस्वरूप भटनागर हे या समितीचे पहिले संचालक होते आणि याच समितीने १९४५मध्ये राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा तसेच राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा स्थापन करण्याचे नक्की केले. बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, पुणे यांचे प्राचार्य डॉ.डी. जी कर्वे यांना राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा उभारण्यासाठी लोकल ॲडव्हायझर कमिटीवर नेमण्यात आले. ६ एप्रिल १९४७ रोजी या संस्थेची मुहूर्तमेढ मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बी.जी. खेर यांच्या अध्यक्षतेखाली रोवण्यात आली.

टाटा ट्रस्टकडून पुण्याजवळची जागा मुक्रर करण्यात आली व टाटा ऑर्गनायझेशनने स्वत:चा रु. ८ लाख, ३० हजाराचा निधी या प्रयोगशाळेसाठी या संस्थेकडे सोपविला.



या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा NCL

**या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत खालील शाखांमध्ये संशोधन चालते.**

- Biochemical Sciences
- Catalysis
- Chemical Engineering
- Inorganic Chemistry
- Materials Chemistry
- Organic Chemistry : Synthesis
- Organic Chemistry : Technology
- Physical Chemistry
- Plant Tissue Culture
- Polymer Chemistry
- Process Development

३ जानेवारी १९५० या दिवशी संस्थेच्या इमारतीचा शुभारंभ भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाला; मात्र संस्थेच्या कामकाजास पूर्वीच सुरुवात झाली होती. मार्च १९४९ मध्येच शास्त्रज्ञ सिद्दिकी यांच्या अधिपत्याखाली ऑरगॅनिक केमिस्ट्री (कार्बनी रसायनी) विभाग सुरू झाला होता. मार्च १९५० मध्ये प्रो. जेम्स. डब्ल्यू. मॅकबेन (F. R.S.) प्रो. स्टेन फोर्ड युनिव्हर्सिटी (U.S.A.)यांना आपल्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे पहिले संचालक नेमले गेले.

पंडितजींनी केलेल्या संस्थेच्या पायाभरणी समारंभाबरोबरच त्याच वेळी पुणे विद्यापीठात सायन्स काँग्रेस सेशन भरले होते. त्या सायन्स काँग्रेससाठी आलेले जगद्‌विख्यात नोबेल लॉरेंटस् होते, सर रॉबर्ट रॉबिन्सन, डॉ. एच्. क्रॉम्टन्, मादाम आयरिन, ज्योलिएट क्युरी आणि भारताचे सर सी. व्ही. रामन. त्यावेळी केलेल्या आपल्या भाषणात प्रो. मॅकबेन यांनी असे उद्‌घोषित केले होते की, ''या रासायनिक प्रयोगशाळेचे उद्दिष्ट केवळ मानवाच्या चांगल्याकरिताच आणि आधुनिक ज्ञानाच्या प्रसारार्थच होईल.'' यानंतर संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. १९५२ मध्ये संशोधनसुविधा व मूलभूत संशोधनाची सुरुवात प्रो. फिंच यांच्या कालखंडात झाली.

१९४७ साली पहिले भारतीय संचालक म्हणून प्रो. व्यंकटरामन यांची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर औद्योगिक संशोधनाचा पाया प्रो. बी. डी. टिळक यांच्या कारकिर्दीत घातला गेला. त्यानंतरच्या डॉ. एल. के. दोरायस्वामी यांच्या काळात अन्न, ऊर्जा, आरोग्य व देशांतर्गत असलेल्या मूलभूत सुविधांचा उपयोग करण्यासाठीच्या संशोधनातील प्रगतीची सुरुवात झाली.

१९८९ नंतर डॉ. माशेलकर यांच्या यशस्वी कारकिर्दीत संशोधन आणि विकास (R&D) या विभागातर्फे आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहांच्या भागीदारीची वाटचाल सुरू झाली. १९९५ नंतर डॉ. पॉल रत्नास्वामी यांच्या नेतृत्वाखाली उच्च तांत्रिक उत्पादने आणि तत्सम तदनुषंगिक प्रक्रिया की, ज्यांची जागतिक पेटंटस् आपल्याला मिळू शकतील, अशी कार्यवाही सुरू झाली.

आज ही राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा देशातील एक नंबरची सर्वाधिक पेटंटस् मिळवणारी कार्यशाळा आहे. सध्या ही संस्था एक ''जागतिक बौद्धिक मालमत्ता''(intellectual property) मानली जाते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेने मिळवलेली आंतरराष्ट्रीय पेटंटस् आणि वेळोवेळी प्रसिद्ध केलेली जगन्मान्य प्रकाशने यांवरून त्यांच्या संशोधनकार्याचा मानवाच्या कल्याणासाठी उपयोग कसा होतो हे दिसून येईल.

या सर्व संशोधनाचे व संस्थेच्या उत्कर्षाचे श्रेय हे वर लिहिलेल्या रथी-महारथी शास्त्रज्ञांचे तसेच त्यांचेबरोबर काम करणाऱ्या तरुण स्त्री/पुरुष शास्त्रज्ञांचेच आहे, असे मानले पाहिजे.

संस्थेच्या कार्याचा थोडक्यात गोषवारा द्यायचा झाला तर, असे म्हणता येईल की, संस्थेने पहिली १५ वर्षे रासायनिक संशोधनात व रासायनिक अभियांत्रिकी यांच्या घडणीत खर्ची घातली. पुढील १० वर्षात उद्योगांसाठी लागणाऱ्या रसायनांचे संशोधन करून त्यांचा उपयोग परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या पदार्थांकरिता एतद्देशीय पर्याय म्हणून कसा करता येईल हे पाहिले गेले.

त्यानंतर १९८०च्या सुमारास व नंतरच्या काळात या प्रयोगशाळेने जीवरसायनशास्त्र, उत्प्रेरकान्वये केलेल्या प्रक्रिया, बहुवारिकी रसायनशास्त्र, अकार्बनी रसायनशास्त्र, कार्बनी रसायनशास्त्र, वनस्पती ऊती संवर्धन आणि तत्सम प्रक्रियाउद्योग यांना जागतिक मान्यता प्राप्त होईल अशी संशोधने केली. संस्थेकडे वरील सर्व संशोधनांसाठी आवश्यक असणारी आधुनिक साधने पर्याप्त मात्रेमध्ये संपादित केलेली आहेत. त्यामध्ये फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोमीटर, स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप, एक्स-रे पावडर डिफ्रॅक्टोमीटर, जी.सी.मास स्पेक्ट्रोमीटर, ॲटोमिक ॲबसॉर्पशन स्पेक्ट्रोमीटर, लेसर रामन स्पेक्ट्रोमीटर, इलेक्ट्रॉन स्पीन रेझोनन्स स्पेक्ट्रोमीटर, मॉस बाऊ स्पेक्ट्रोमीटर, सॉलिड स्टेट एन एम आर ही आधुनिक तांत्रिक यंत्रे समाविष्ट आहेत. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे सुमारे २०० पर्सनल कॉम्प्युटर्स व राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटर)चा सुपर कॉम्प्युटर यांचाही उपयोग संस्था करीत आहे.

संस्थेत अविरत कार्यरत असणाऱ्या तंत्रज्ञ व शास्त्रज्ञांना आवश्यक असणाऱ्या एका मोठ्या ग्रंथालयाची सोय या संस्थेत असून, त्यात सुमारे एक लाख वीस हजार शास्त्रीय प्रकाशने, पुस्तके, नियतकालिके आहेत. त्यामध्ये तांत्रिकवृत्त, आंतरराष्ट्रीय परिमाणे व पेटंटस्, संशोधन व विकास प्रबंध आदीही अंतर्भूत आहे.

सुमारे ५०० शास्त्रज्ञ या संस्थेत संशोधनात मग्न असून, त्यात सुमारे सव्वाशेच्यावर डॉक्टरेट मिळवलेले आहेत. त्यांच्यापैकी बऱ्याचजणांनी अमेरिका, युरोप व जपानमध्ये पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च वर्क केलेले आहे. रसायनशास्त्राच्या सर्व शाखांमध्ये हे शास्त्रज्ञ पारंगत असून, त्यांनी आपली योग्यता निरनिराळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून सिद्ध केली आहे. देशातील मोठ्या रासायनिक प्रयोगासाठी या संस्थेने

आपले ज्येष्ठ शास्त्रज्ञ पुरविले आहेत. देशातील उद्योगांना आवश्यक असणारे – सल्ला देणारे शास्त्रज्ञ या संस्थेने पुरविले असून, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवाही ही संस्था देत असते. परदेशातील ड्यूपॉन्ट, इस्टमन कोडॅक, रोम अ‍ॅण्ड हास, टोयोबो, टोरे आणि युनिलिव्हर या परदेशी कंपन्यांनादेखील शास्त्रज्ञ पुरविण्याचे काम संस्थेने केले आहे. जागतिक स्पर्धेला तोंड देऊन संस्थेने चीनलाही १९९१ मध्ये आपला बहुमोल सल्ला देऊन तसा करार केला आहे.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा ही अद्ययावत् संशोधन करणाऱ्या संस्थांत जगन्मान्य झालेली आहे. हळूहळू ही संस्था जगातील अनेक कंपन्यांचे रिसर्च कॉन्ट्रॅक्ट घेणारी, तसेच त्यांना तांत्रिक सल्ले पुरविणारी, त्यांच्या संशोधनकार्यात मदत करणारी अशी एक विशाल/व्यापक संस्था झालेली आहे. मात्र या सर्व कार्यात या प्रयोगशाळेने केलेली संशोधने ही पूर्णत: कायदेशीररीत्या संरक्षित केलेली असून, तिने सर्व देशांमधील इतर कोणत्याही संस्थेपेक्षा जास्त पेटंटस् मंजूर करून घेतली आहेत. या सर्व प्रगतीवरून ही संस्था कशी प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे हे दिसून येईल.

मित्रांनो, या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेची दारे सताड उघडी आहेत. पण कोणासाठी? ज्या कोणाला रासायनिक तंत्रज्ञानाची आवड आहे, रासायनिक उत्पादने करावयाची आहेत, ज्यांना सध्या चालू असलेल्या संस्थेतील संशोधनकार्यात आवड आहे अशा सर्वांसाठी हे द्वार खुले आहे. पूर्वपरवानगीने, संचालक राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे ८ येथे संपर्क साधा.

●●


संकलन – स्वाती ढेकणे
वायरलेस कॉलनी, औंध,
पुणे ४११ ००७

# टार्पेडो म्हणजे काय?

**स्वा**तंत्र्यदिन विशेषांकात 'गाझीच्या विनाशाचे गुपित' या लेखात आपण टार्पेडोचा उल्लेख वाचला. टार्पेडो म्हणजे काय? याची माहिती आता करून घेऊया.

शत्रूंच्या जहाजावर किंवा पाणबुडीवर आक्रमण करण्यासाठी, पाणबुडीवर जहाजावरून किंवा विमानातून प्रक्षेपित करता येईल, अशा चिरूटाच्या आकाराच्या स्वयंचलित जलप्रक्षेपणास्त्रास 'टार्पेडो' म्हणतात. खोली आणि दिशा यांचे नियंत्रण करण्यासाठी आधुनिक टार्पेडोत 'जटिल यंत्रे' असतात. जेव्हा तो आपल्या लक्ष्याच्या जवळ येतो किंवा लक्ष्यावर आपटतो तेव्हा त्याचा स्फोट होतो. शत्रूची जहाजे व पाणबुड्यांना नष्ट करणारे हे एक विध्वंसक अस्त्र आहे.

रॉबर्ट व्हाईटहेड नावाच्या एका इंग्रज इंजिनियरने १८६६ साली या यंत्राचा शोध लावला. हा टार्पेडो पाण्याच्या आत अत्यंत वेगाने शेकडो मीटरचे अंतर पार करीत असे. त्यानंतर आधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्जित, असे अनेक टार्पेडो विकसित करण्यात आले. टार्पेडोच्या मागील भागात स्फोटक द्रव्ये ठेवलेली असतात. समोरील भागात बरीच यंत्रसामग्री असते. यामुळे टार्पेडोचे स्थायित्व कायम राहते. यातील हवेची पात्रे दर वर्ग इंचाला वीस हजार कि. ग्रॅमचा दाब सहन करण्याची क्षमता ठेवतात. ही पात्रे पुढील भागात ठेवलेली असतात. मधल्या भागात दंतचक्र (गियर) स्टॉप व्हाल्व्ह चार्जिंग, व्हाल्व्ह इत्यादी यंत्रे बसविलेली असतात. शेपटाकडील भागात मुख्य इंजिन व स्टिअरिंग बसविलेले असते. याची दिशा नियंत्रित करण्यासाठी यात अनेक जटिल यंत्रे बसविलेली असतात.



आता अनेक प्रकारचे, टार्पेडो उपलब्ध झाले आहेत. त्यांची रचना एकसारखी असली तरी त्यांचा वेग आणि विध्वंसक शक्ती भिन्न असते. शत्रूच्या पाणबुड्या व जहाज यांना नष्ट करण्यासाठी अधिकाधिक विध्वंसक टार्पेडो तयार करण्यात शास्त्रज्ञ आता गुंतले आहेत.

●●

# 'माझी आजी'

– अनघा लवळेकर

**का**ही व्यक्ती आपल्यातून कायमच्या निघून जातात; पण त्यांच्या आठवणीचा सुगंध मात्र आपल्या मनात नेहमीच दरवळत राहतो. विशेषत: आपल्या निकटच्या, जिवाभावाच्या आप्तांच्या स्मृती तर आयुष्यभराकरता आपली सोबत करतात, दिशाही दाखवतात. माझी आजीही एक अशीच विलक्षण व्यक्तिमत्वाची स्त्री होती. स्वातंत्र्यपूर्वकाळातील अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या पदवीधर (तेव्हाची B.A.B.T.) स्त्रियांपैकी एक! आपल्या प्रबोधिनीच्या संस्थापकांची–कै. आप्पांची थोरली बहीण म्हणजेच श्रीमती दमयंती दत्तात्रय गोखले तथा चमूताई. आपला थोरलेपणा जपून त्यांना त्यांच्या लोकविलक्षण कार्यात कायम पाठराखीण झालेली. प्रसंगी दटावणारी, रागावणारी सुद्धा!

एकूणच 'पेंडसे' घराण्याची एक जिद्द, आग्रहीपणा, निश्चयीपणा तिच्याही स्वभावात तंतोतंत उतरलेला होता. आपल्या पिढीच्या विचारांच्या चार पावलं पुढेच चालणारी ती एक अत्यंत आधुनिक स्त्री होती. (प्रसंगी ती आम्हाला–तिच्या नातींनासुद्धा–'किती ग तुम्ही काकूबाई सारख्या राहता! जरा गडद रंगाच्या, झुळझुळीत साड्या नेसत जा' असं सुनवायची!) माझ्या आजीकडे मी पहिल्यांदा सोलर कुकरमधील नानकटाई खाल्ली होती. जे जे नवीन तंत्रज्ञान येईल, ते आधी आपण वापरून बघायचंच असा तिचा आग्रह असे. वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षांपर्यंत रोजचं वर्तमानपत्र न चुकता वाचणारी, दूरदर्शनवरील बातम्या काळजीपूर्वक ऐकणारी–बघणारी–घराबाहेर–देशात कायकाय चालू आहे याबद्दल सतत सजग असणारी, ती एक 'संसारी' बाई होती. आम्हाला खूप आश्चर्य वाटायचं– आम्ही म्हणायचो– 'आजी, तुला काय गं एवढा इंटरेस्ट आहे, या सगळ्या भानगडीत?' तेव्हा तीच आम्हाला रागवायची– 'म्हणजे काय? आपल्या देशात काय चाललंय ते कळायला नको? मी नागरिक नाही का या देशाची?'– १९७९ साली जेव्हा जनता सरकार कोसळलं तेव्हा ती परदेशात–अमेरिकेत होती; पण ती बातमी तिकडे कळल्यावर ती इतकी अस्वस्थ झाली की, सरळ ट्रीप गुंडाळून परत निघून आली. 'इकडे आपल्या देशात इतक्या घडामोडी चालू आहेत नि मी तिकडे काय enjoy करू?' ही तिची आपल्या मातीबद्दलची ओढ बोलत होती. अगदी अंथरूणाला खिळेपर्यंत जेवढ्या निवडणुका झाल्या तेवढ्यांमध्ये तिनं आग्रहानं मतदान केलं – ठाम तात्त्विक भूमिका घेऊन – आमच्याशी वाद घालत– केवळ उपचार म्हणून नव्हे!

ती गेल्यावर जेव्हा गेल्या चाळीस–पन्नास वर्षांच्या तिच्या अगदी व्यवस्थित लावलेल्या डायऱ्या आम्ही काढल्या तेव्हा खरंच थक्क व्हायला झालं.
(या डायऱ्यांना ती आम्हाल कधी हात लावू देत नसे. तिची घारीची नजर असायची–आमच्यापैकी कुणी हळुच ती बघतंय का यावर!) कुटुंबातले जन्म–मृत्यू, सणवार, घटनांपासून त्या त्या दिवशी पुण्यात–महाराष्ट्रात–देशात–जगात काय काय घडलं त्याची त्रोटक पण नेमकी नोंद त्या त्या तारखेखाली घातलेली. वर स्वत:च्या comments लिहिलेल्या. मनात आलं की एखाद्या चिकित्सक संशोधकाला ह्या डायऱ्यांचा अभ्यास करून पीएच.डी सुद्धा मिळवता येईल असा अनमोल दस्तऐवज आहे तो! (त्यात डायना–चार्ल्सच्या विवाहाची बातमीसुद्धा– 'ही सामान्य घरातील मुलगी ह्या राजघराण्यात कशी जुळवून घेणार कोण जाणे' ह्या मतासह नोंदलेली दिसली तेव्हा आम्ही अगदी hats off केलं!)

प्रबोधिनीबद्दलची तिची आत्मीयता तर अगदी हृदयाच्या तळवटापासून होती. आप्पांचं हे स्वप्न जणू ते गेल्यावर तिच्या चिंतनाचा एक अगदी अविभाज्य भाग बनलं होतं. इथे काय चालू आहे– नवीन उपक्रम –व्यक्ती–नियुक्त्या–सन्मान साऱ्याची माहिती तिला अगदी तपशीलवार हवी असे –जर ती मिळाली नाही तर जो प्रबोधक–प्रबोधिका भेटेल तिच्याकडे चौकशी होणार– तरीही समाधान झालं नाही तर मा. संचालकांपर्यंत सर्वांना पत्रं जाणार हे ठरलेलं! हा अधिकार जसा हक्काचा होता तसाच मायेचाही होता. प्रबोधिनीला पेंडसे परिवाराकडून देणग्या मिळवून देणं, प्रसंगी स्वत: खारीचा वाटा उचलणं हे सारं त्या निखळ आत्मीयतेतून अगदी शेवटच्या श्वासापर्यंत होत होतं.

तिच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या निमित्तानं आज वाटलं की, अशा विलक्षण व्यक्ती कितीतरी कुटुंबात असतात. काळाच्या पुढं चार पावलं चालणाऱ्या, दोन पिढ्यांमधला दुवा बनणाऱ्या, कधी कधी टीकेचं लक्ष्यही होणाऱ्या! त्यांच्या अंतरंगात डोकावून बघितलं तर मात्र तिथे वेगवेगळ्या अनमोल विचारांची एक विलक्षण गुंफण बघायला मिळते. मग प्रसंगी विक्षिप्त, आग्रही, जाचक वाटणारे ते कंगोरे अगदी पारदर्शक होतात– आपल्यातल्याच ह्या गुणविशेषांची आठवण करून देतात! 'माझी आजी' वाचण्याच्या निमित्तानं तुमच्यापैकी अनेकांना अशा व्यक्तींच्या स्मृतींचे सुगंध जाणवतील, ते जपतच आपण आपले मार्ग निवडायचे आहेत याची आठवण करून देतील! ●●

अनघा कुकडे – लवळेकर
'ज्ञानिया' २४ विवेक सोसायटी
पद्मावती, पुणे ९

# प्रतिसाद वाचकांचा

छात्र प्रबोधन हे मासिक सुरू होऊन पाच वर्षे झाली. मासिकाचे स्वरूप हे सतत ताजे-टवटवीत, वाचकांना हवेहवेसे वाटणारे असावे अशी इच्छा आहे. तसेच छात्र प्रबोधनचे वाचक केवळ निष्क्रिय वाचक न राहता त्यांनी चारित्र्यसंपन्न व्यक्ती बनून भविष्यात देशाचे नेतृत्व करावे असा दूरगामी हेतू मनात ठेवून (केवळ मासिक नव्हे तर उपक्रमांचा स्रोत) विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. मासिकाकडून विद्यार्थ्यांच्या काय अपेक्षा आहेत, त्या किमी प्रमाणात पुऱ्या केल्या जातात, तसेच आम्हालाही 'छात्र प्रबोधन'च्या माध्यमातून जे घडावेसे वाटते ते किती प्रमाणात आपल्यापर्यंत पोहोचते या दोन्ही बाजू जाणून घेण्यासाठी प्रश्नावली देण्यात आली होती. महाराष्ट्रातील पुणे, औरंगाबाद, नगर, नाशिक, सांगली, सातारा, ठाणे, धुळे, परभणी इ. जिल्ह्यांतून ७०० प्रश्नावल्या भरून आल्या.

विद्यार्थ्यांसमवेत काही अध्यापकांनीही प्रश्नावल्या भरून पाठवल्या. एकूण सभासद संख्येच्या फक्त १५% सभासदांनीच प्रश्नावली भरून पाठवली याबद्दल थोडा खेद वाटला. यंदा मात्र आपण सर्वांनीच जाणीवपूर्वक प्रश्नावली भरून पाठवली तर मासिकात केले जाणारे बदल व आपल्या अपेक्षा यांचा मेळ घालता येणे शक्य होईल.

प्रश्न क्र. १ ते ७ हे सर्वसाधारण मासिकाबद्दलचे मत अजमावण्यासाठी विचारण्यात आले होते. त्यात बऱ्याच मुलांनी मासिकातून दिल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले आहे. मनोरंजनाबरोबरच, ज्ञानवर्धक, सर्वांगीण विकास साधणारे मासिक इ. प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

३० ते ४०% मुलांना कथा व विज्ञानावरचे लेख आवडतात असे दिसून आले. 'अभ्यासातील स्वावलंबन' ही लेखमाला विशेष आवडते असा उल्लेख बऱ्याच मुलांनी केला आहे. 'चालू असलेल्या कोणत्या लेखमाला, लेख मासिकात नसल्या तरी चालतील?' या प्रश्नाचे उत्तर देताना ४०% मुलांनी सर्वच लेख हवेत असे उत्तर दिले आहे. तर ५५% मुलांनी काहीच उत्तर दिले नाही. फक्त ५% मुलांनी 'संवाद भारतीय भाषांशी', विज्ञान खगोलशास्त्र नसावे अशी प्रतिक्रिया नोंदवली आहे. नवीन कोणत्या लेखमाला असाव्यात या प्रश्नाचे उत्तर देताना २५% मुलांनी विज्ञान व अंतराळ, १०% मुलांनी थोर नेत्यांची चरित्रे, तर ३% मुलांनी संगणकाविषयी लेख द्यावे असे म्हटले. चालू घडामोडींविषयी ४% मुलांनीच उत्सुकता दर्शवली, तसेच क्रीडेविषयी १०% मुलांना आकर्षण आहे. १८% मुलांनी अभ्यास, नवीन तंत्रज्ञान, परदेशी संस्कृतीचा परिचय यांविषयी मागणी केली आहे, तर ३०% मुलांनी काहीही उत्तर दिलेले नाही.

मासिकात दिलेल्या कृतींविषयी १५% विद्यार्थी नेहमी कृती करून पाहतात. २०% त्याकडे अजिबात वळत नाहीत. ४५% कधीकधी तर २०% क्वचित कृती करून पाहतात.

प्रश्न क्र. ८ मध्ये 'छात्र प्रबोधन'च्या वाचनाने तुमच्यात काही बदल झाला का? याविषयी विचारण्यात आले होते. अतिशय आनंदाची गोष्ट म्हणजे आमच्याप्रमाणेच विद्यार्थ्यांनाही हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो, असे त्यांच्या प्रतिसादावरून दिसते. सुमारे ७०% विद्यार्थ्यांनी मासिक वाचल्यामुळे आपल्यात बदल झाल्याचे मत प्रकट केले आहे. ४०% विद्यार्थ्यांनी आपल्या मनात नवीन विचार रुजले अस मत आवर्जून मांडले आहे. त्यात अंधश्रद्धा निर्मूलन, घातक रुढींचा प्रतिकार, जिद्द, धाडस, देशप्रेम, भारतीय संस्कृतीचा अभिमान, स्वावलंबन, व्यायामाविषयी, प्रार्थनेविषयी जागरुकता यांचा उल्लेख आहे. रोजच्या दिनक्रमात शिस्त, व्यायाम, नियोजन इ. ची भर पडली असे अनेकांनी म्हटले.

'मासिकातील लेखांबाबत कुणाशी चर्चा करता?' या प्रश्नाचे उत्तर ५०% मुलांनी दिले नाही. २०% मुले अजिबात चर्चा करत नाहीत, तर उरलेली ३०% मुले आपले मित्र, शिक्षक, पालक यांच्याशी काही प्रमाणात चर्चा करतात असे आढळते. 'छात्र प्रबोधनचे' विद्यार्थीप्रतिनिधी म्हणून काम करण्याची इच्छा २५% विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

'शाळा, घर, मित्र-मैत्रिण या संदर्भात तुम्हाला भेडसावणारे ५ महत्त्वाचे प्रश्न लिहा.' या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने दिले आहे. ५०% मुलांनी आपल्या भावना, त्यांच्या मनाला भेडसावणाऱ्या प्रश्नातून व्यक्त केल्या आहेत. शाळेची वेळ, परीक्षा, शाळेला

# छात्र प्रबोधन प्रश्नावली १९९७

(योग्य त्या पर्यायावर (√) अशी खूण करा. जेथे स्वत:चे उत्तर लिहावयाचे आहे तेथे थोडक्यात लिहा. सुवाच्य व नीटनेटकेपणाने लिहा.)

**नाव:–** **सभासद क्रमांक :–** **गाव:–** **इयत्ता:–**

१) तुमच्या घरी छात्र प्रबोधनचा अंक केव्हापासून येत आहे? **१ वर्ष / २ वर्षे / ३ वर्षे / ४ वर्षे / ५ वर्षे**

२) तुम्हाला अंक नियमितपणे मिळतात का? **हो/नाही.** मिळत नसल्यास गेल्या वर्षात कोणते अंक मिळाले नाहीत?———

(वर्ष व अंक क्रमांक लिहावे.) ———

३) छात्र प्रबोधन व्यतिरिक्त मुलांसाठीची कोणती मासिके वाचता ? **अ)** **ब)**

४) तुमच्या व्यतिरिक्त तुमच्या घरी येणारे छात्र प्रबोधन मासिकाचे अंक अन्य कोण कोण वाचतात?

———

५) तुम्हाला छात्र प्रबोधन मासिकाचे काय वेगळेपण वाटते?———

———

६) मासिकातील कोणते लेख, लेखमाला तुम्हाला विशेष आवडतात?———

———

७) मासिकामध्ये नवीन कोणत्या लेखमालांची/विषयांची भर घालावी? ———

———

८) मासिकात दिलेल्या कोणकोणत्या कृती गेल्या वर्षभरात तुम्ही करून बघितल्यात?———

———

९) संवाद वाचता का? **हो/नाही.** **नियमितपणे/अधूनमधून / क्वचित / अजिबात नाही.**

१०) 'संवाद' मधून सूचित केलेले संकल्प / कृतीपैकी कोणते संकल्प / कृती गेल्या वर्षभरात केल्या?

———

११) छात्र प्रबोधनच्या वाचनामुळे स्वत:मध्ये काही बदल झाले का? **हो/नाही.**

अ) नवीन विचार मनात रुजला का? **हो/नाही.** असल्यास कोणता?———

———

**आ)** रोजच्या दिनक्रमात काही बदल झाला का? **हो/नाही.** असल्यास कसा?———

———

**(येथे कापा)**

— — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — —

क्रीडांगण नसणे, अध्यापकांचे अध्यापन समाधानकारक वाटत नाही. अशा समस्या विद्यार्थ्यांनी मांडल्या आहेत.

मैत्री, स्वत:चे घर, घरातील व्यक्ती, मित्र यांचे परस्पर भावसंबंध इथपासून ते घराच्या आजूबाजूचा परिसर इ. स्थूलापासून सूक्ष्मापर्यंत अनेक प्रश्न मुलांना भेडसावत असतात.

अन्य सूचना व अभिप्रायामध्ये, अनेक स्पर्धा असाव्यात, इंग्रजीचा स्वतंत्र विभाग असावा, वृत्तपत्रात मासिकाची जाहिरात द्यावी आणि उपकेंद्रांची संख्या वाढवावी, शिबिरे पुण्याबाहेरही व्हावीत इ. सूचना होत्या. त्याचबरोबर मुखपृष्ठ अधिक रंजक असावे, अंकास उशीर होऊ नये इ. मौलिक सूचनाही होत्या.

एकूण प्रश्नावलीतून, विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्रतिसादावरून मासिक विद्यार्थ्यांना आवडते आहे हे जाणवते. तरीही अनेक प्रश्नांची उत्तरे देताना, विद्यार्थ्यांनी केलेला आळस वारंवार

इ) वागणुकीत, स्वभावात बदल झाला का? **हो/नाही.** असल्यास कसा? ______

______

ई) जिद्दीने एखादी गोष्ट करून बघितली का? **हो/नाही.** असल्यास कोणती? ______

______

उ) छात्र प्रबोधनच्या वाचनातून आपणही इतरांसाठी काहीतरी केले पाहिजे अशी तीव्र इच्छा मनात निर्माण झाली का? **हो/नाही.** केव्हा/ कोणत्या लेखामुळे? ______

______

१२) मासिकातील लेखांबाबत मित्रांशी / घरच्या व्यक्तीशी/ शिक्षकांशी चर्चा करता का? **हो/नाही.** कोणाशी, कोणत्या लेखांवर?

______

१३) छात्र प्रबोधनद्वारा आयोजित उपक्रमांमध्ये सहभागी झाला होता का? **हो/नाही.** कोणत्या?

______

१४) वाढदिवसाचे शुभेच्छापत्र मिळाले का? **हो/नाही.** ह्यावर्षी वाढदिवसाला कोणता संकल्प केला?

______

१५) गेल्या वर्षभरात छात्र प्रबोधनशी कधी पत्रव्यवहार केला होता का? **हो/नाही.** काय निमित्ताने?

______

१६) छात्र प्रबोधनच्या संपादकांना तुम्ही तीन प्रश्न विचारा. १) ______

२) ______ ३) ______

१७) शाळा/ घर/ मित्र-मैत्रिणीं या संदर्भात तुम्हाला भेडसावणारे ४ महत्त्वाचे प्रश्न लिहा.

१) ______ २) ______

३) ______ ४) ______

१८) 'छात्र प्रबोधन' मासिकाच्या स्वरूपात, तसेच उपक्रमात कोणत्या गोष्टींची भर घालावी/ बदल करावा असे तुम्हाला वाटते?

______

१९) अन्य (अभिप्राय, सूचना, प्रतिक्रिया) ______

______

स्वाक्षरी

(येथे कापा)

जाणवत होता. 'छात्र प्रबोधन'चा वाचक, डोळस वाचक व्हावा, चांगल्या-वाईटाचा नीर-क्षीर विवेक त्याला करता यावा; स्वत:ला काय हवे आहे ते त्याला चांगले समजावे, मासिकाचे परीक्षण करताना आत्मपरीक्षणही करता यायला हवे यादृष्टीने यावर्षीची प्रश्नावली आपण विचार करून भरावी ही अपेक्षा आहे. अंकाला होणारा उशीर, काही राहून गेलेले विषय, उपक्रमांची व्याप्ती वाढवण्याची गरज, अंकाचे स्वरूप आकर्षक करण्याची गरज इ. त्रुटी विद्यार्थ्यांच्या प्रतिसादातून पुन: एकदा प्रकर्षाने जाणवल्या. त्यात सुधारणा करण्याचा निश्चितच प्रयत्न करू. त्याचबरोबर कृती, उपक्रम, स्पर्धा यांत आपला सक्रिय सहभाग दिवसेंदिवस वाढावा. मासिकाचा आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी आपण जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा या रास्त अपेक्षा तुमच्याकडून पूर्ण झाल्या, तर आमचे उद्दिष्ट साध्य होईल यात शंकाच नाही.



छात्र प्रबोधनचा दीपावली विशेषांक अनेकांना भेट द्या. कि.रु. ४०/-२५ ऑक्टोबरनंतर वितरण केंद्रावर उपलब्ध.

# नोव्हेंबर मधील कार्यक्रम

**ग्रामीण भागातील अभ्यास सहल –** एखाद्या रविवारी आपल्या गावापासून १० ते२० कि.मी. अंतरावर असलेल्या ७०० ते १००० वस्तीच्या खेडेगावात विद्यार्थ्यांनी विविध घरामध्ये जाऊन तेथील ग्रामस्थांशी गप्पागोष्टी कराव्यात. आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, पाणी, शेती, अन्य उद्योग धंदे, दूध–दुभते, गाई–म्हशी, रस्ते–वीज इ. सुविधा, गावाचे प्रश्न इ. बाबत विविध प्रश्न विचारून गावाची माहिती घ्यावी. शिवार हिंडून यावा. गावातील विहिरी, पाण्याच्या अन्य जागा बघाव्यात, गावठाण्यात फेरफटका मारून यावा. शक्य झाल्यास मुलांना गावाचा नकाशा काढण्यास सांगावे. त्यांच्याच वयाच्या मुलामुलींना गोळा करून त्यांच्याबरोबर खेळावे, गाणी म्हणावीत, हिंडावे, सहभोजन करावे. शक्य झाल्यास शेतामध्ये, घरामध्ये २–३ तास काम करावे. शोषखड्डा करणे, स्वच्छता करणे, मंदिराच्या भिंती रंगवणे, वृक्षारोपण करणे इ. श्रमदानाचे एखादे काम करावे. गावाच्या वाड्या–वस्त्या असल्यास तेथेही गटागटाने जाऊन त्यांच्याशी गप्पा माराव्यात. त्यांचे प्रश्न समजावून घ्यावे. विद्यार्थ्यांना समाजदर्शन व्हावे, ग्रामस्थांशी संवाद साधता यावा व ग्रामीण भागातील प्रश्नांची तोंड ओळख व्हावी, हा मुख्य उद्देश समजावा. त्याबरोबर खेळ व अन्य गमतीचे कार्यक्रमही जरून असावेत. शेवटी एकत्र बसून चर्चा करावी. ग्रामीण भागात विकसनाची कामे केलेल्या एखाद्या व्यक्तीला शक्य झाल्यास या सहलीच्या समारोपाला बोलावावे. सहलीला जाण्यापूर्वी, सहलीची नीट योजना करावी व विद्यार्थ्यांना या सहलीचा हेतू सांगावा. विविध प्रकारचे प्रश्न काढण्यास सांगावेत. जोड्या करून त्यांना विविध विषय वाटून द्यावेत. प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात मुलाखत न घेता गप्पांमधून, निरीक्षणामधून अधिकाधिक गोष्टी समजून, माहीत करून घ्याव्यात. त्यासंबंधी नंतर लेखन करण्यास सांगावे. त्या गावाबद्दल (इतिहास–वर्तमान) छोटी पुस्तिका मुलांना तयार करण्यास सांगावी.

**दिवाळीच्या सुट्टीमध्ये एक दिवसाचे शिबिर घेताय ना! पुण्यातील तंबूतील शिबिरांना आपल्या येथील काही विद्यार्थ्यांना अवश्य पाठवा!**

# गावोगावचे गेल्या दोन महिन्यातील कार्यक्रमांचे संक्षिप्त वृत्त

**पार्ले :** १० ऑगस्ट पासून विकासिकांचे साप्ताहिक वर्ग सुरू आहेत. सुमारे ३५ ते ४० विद्यार्थी उपस्थित असतात. योगासने, प्रबोधन गीते, वाचनकौशल्याचे प्रशिक्षण व सराव आणि अन्य काही खेळ असा कार्यक्रम असतो.

१५ ऑगस्ट रोजी, पार्ल्याच्या सुवर्णमहोत्सव समितीने आयोजित केलेल्या चित्ररथफेरीमध्ये आपल्या गटाने संतदर्शन (संत गाडगे महाराज) हा विषय निवडला होता. मुलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. संकल्पना–सजावट मुलांनीच संयोजकांच्या मदतीने केली होती. कार्यक्रम खूप छान झाला. एक वेगळाच अनुभव मिळाला. गणेशोत्सवामध्ये काही भागांमध्ये पथनाट्ये सादर केली. तोही अनुभव, उत्साह अन् आत्मविश्वास वाढविणारा झाला.

**डोंबिवली :–** २७ जुलै पासून साप्ताहिक विकासिका सरू झाल्या. उपस्थिती १३ ते २०च्या दरम्यान असते. विविध बौद्धिक खेळ, वाचनकौशल्यांचा सराव, प्रबोधन गीते, लेझीम, उपासना, असे नित्य कार्यक्रम चालू आहेत. २२ ऑगस्टला वांगणी येथील चंदेरी गडावर दिलेल्या नकाशाच्या साहाय्याने वाट शोधत ८–१० कि.मी. पायी चालण्याची पावसाळी सहल झाली.

**बोरीवली :–** १३ जुलैपासून साप्ताहिक विकासिका सुरू झाल्या. उपस्थिती १२५ ते १५० असते. नागपंचमीनिमित्त सर्पविषयक माहिती घेणे व प्रत्यक्ष साप हाताळणे असा कार्यक्रम झाला. वसई जवळच्या तुंगारेश्वरावर २ वेळा २ स्वतंत्र गटांची पावसाळी सहल झाली. पावसात विद्यार्थी मनसोक्त भिजले. सुमारे १५ ते २० कि.मी. चालणे झाले. नित्य उपक्रमांमध्ये गटश: विविध कार्यक्रम चालू आहेत. कल्पनाशक्ती वाढविणारे खेळ, गटचर्चा वक्तृत्वकौशल्य, प्रबोधन गीते, उपासना इ. कार्यक्रम होतात.

**सांगली:–** १ जुलैपासून आठवड्यातून २ दिवस क्रीडादल चालू आहे. व्यायाम, संचलन, मैदानी खेळ, बरची नृत्य इत्यादी क्रीडांगणावरील कार्यक्रम होतात. त्या व्यतिरिक्त आजुबाजूच्या घडामोडींसंबंधी व्याख्याने, चर्चा, व्यावहारिक ज्ञान मिळविण्यासाठी तार, मनिऑर्डर, डिमांड ड्राफ्ट इ. गोष्टी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष केल्या. ३१ ऑगस्टला रामलिंग, धुळोबा येथ पावसाळी सहल गेली. १०–११ कि.मी. च्या चालण्याच्या या सहलीत विद्यार्थ्यांनी मोर बघितले.

या व्यतिरिक्त इचलकरंजी, रत्नागिरी, अलिबाग व औरंगाबाद येथे साप्ताहिक कार्यक्रम तर सातारा, नाशिक येथे प्रासंगिक उपक्रम चालू आहेत. त्याचे वृत्त पुढच्या अंकात.

अमरावतीच्या हिवरे–मुराद या गावातील श्री. अशोक मुरादे यांनी अमरावती जिल्ह्यातील नांदगाव व अकोला जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील ७ शाळांमधील मुलींसाठी राखी निर्मिती प्रशिक्षण व स्पर्धा असा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील त्यांची धडपड विशेष उल्लेखनीय आहे.

# ''छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक'' वितरण व्यवस्था

महाराष्ट्र-गोवा-बेळगाव मिळून ७९ ठिकाणी दीपावली विशेषांकाची वितरण व्यवस्था केली आहे. या वितरण केंद्रांची नावे खाली दिलेली आहेत. सभासदांनी मुखपृष्ठाच्या आतील पानावरील व्यवस्थेसंबंधीचे निवेदन वाचून त्याप्रमाणे २५ ऑक्टोबर नंतर आपला दिवाळी अंक घेऊन जावा. अंक नेताना या अंकातील प्रश्नावली भरून द्यावी.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत त्या गावांमध्ये कोणी सभासद जर जवळपासच्या वितरण केंद्रावरून अंक घेऊन जाणार आहेत ते कळवावे म्हणजे त्याप्रमाणे त्यांचे दिवाळी अंक तेथे पाठविले जातील.

ज्यांची वर्गणी दिवाळी अंकाचे वेळी संपणार आहे त्यांनी दिवाळी अंक घेताना आपली वार्षिक वर्गणी वितरण केंद्रावरच जमा करावी. बहुतांशी केंद्रावर ज्ञान प्रबोधिनीची विविध प्रकाशने, जुने दिवाळी अंक, ध्वनिफिती व छात्र प्रबोधनचा इंग्रजी अंक विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आपण ते पाहून अवश्य खरेदी करावेत.

दीपावली विशेषांक अधिकाधिक जणांना वेळेत व खात्रीशीर मिळावा, यासाठी केलेली ही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी सर्व सभासद सहकार्य करतील असा विश्वास वाटतो. वितरणकेंद्रावरील कार्यकर्त्यांना सहकार्य करावे ही विनंती.

## छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक वितरण केंद्रे

### १. मुंबई विभाग

(मुंबई भागातील सांताक्रुझ, जुहू, पार्ले, अंधेरी, जोगेश्वरी येथील सभासदांनी पार्ले येथून; गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर येथील सभासदांनी बोरीवली येथून; विक्रोळी, भांडूप, मुलुंड येथील सभासदांनी मुलुंड येथून आपापले दिवाळी अंक घेऊन जावेत. उर्वरित मुंबईमध्ये अंक पोस्टाने पाठविले जातील. त्यापैकी कोणी वरीलपैकी एखाद्या केंद्रावरून अंक घेऊन जाणार असल्यास त्यांनी तसे कळवावे. कल्याण, अंबरनाथच्या सभासदांनी डोबिवलीच्या केंद्रावरून अंक घेऊन जावेत.)

**बोरिवली** – **१) सौ.अर्चना साठे,** साठे हाऊस, क्रासरोड नं. २, बोरिवली(पू.) ☎ ८०६०२४१
**२) सौ. अंजली जोशी,** ४०१ रमणिक टेरेस, कस्तुर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (प.) ☎ ८०५६२५९
**पार्ले** – **सौ. वसुंधरा भोसले,** 'त्रिमूर्ती' प्लॉट नं. ३९, तेजपाल स्कीम, रोड नं. ३, विलेपार्ले (पू.) ☎ ८२०४०७६
**वसई** – **कु. आरती जयंत जोशी,** सुयोग अपार्टमेंट, ब्राह्मणआळी, पापडी, वसई.
**मुलुंड** – **श्री. त्रिंबक जोशी,** एफ/१७, शिवदर्शन सोसा., सेंट पायस हायस्कूलसमोर, पं. मालवीय रस्ता, मुलुंड (प.)☎ ५६९२२६०
**ठाणे** – **डॉ. अजित दातार,** बी २० अहिल्या सोसा., घंटाळी रस्ता, घंटाळी मंदिराजवळ, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** – **१)सौ. सविता सुनील ढोणसळे,** बी-१३ कॉमेटकुंज को. हौ. सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली(पू.) ☎ ४५४६८८
**२) सौ. मीनल विजय आगटे,** सीताराम स्मृति, ब्लॉ.नं. १०१, स्वामी विवेकानंद शाळेजवळ, महात्मानगर, डोंबिवली(प.)

### २. कोकण-गोवा- बेळगाव विभाग

**पनवेल** – **श्री. मकरंद कुलकर्णी,** अ/६ गीतांजली सोसा., लोखंडीपाडा, पनवेल ☎ ७४५४५०७
**रसायनी** – **श्री. शाम कोकीळ,** ५ अ वरद विनायेक सो., राममंदिरासमोर, पो. मोहपाडा, ता. खालापूर☎ ५१२९६
**पेण** – **श्रीमती अनुराधा प्रकाश जोशी,** अच्युतराव टिळक वाडा, हनुमान आळी, पेण ☎ ३३६४
**कर्जत** – **सौ. कल्पना श्रीपाद कुलकर्णी,** अ/२, गायत्री अपार्टमेंट, नानामास्तर नगर, कर्जत ☎ २३०१३
**महाड** – **श्री. ग. गो. गाडगीळ,** १७५७ काकरतळे, महाड
**अलिबाग** – **१) श्री. राम जोशी,** १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग. ☎ २५३०९
**२) डॉ. अरविंद केळकर,** केळकरवाडी, जोगेळेकर नाका, अलिबाग ☎ २२७७९
**रत्नागिरी** – **सौ. अंजली कार्लेकर,** लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी. ☎ २०७२४
**दापोली** – **श्री. विष्णू सोमण,** द्वारा महाराज ब्रेव्हरेज, स्टेट बँक गल्ली, पेट्रोल पंपाजवळ, दापोली ☎ ८२१९१/८२८०२
**चिपळूण** – **श्री कानडे,** उपमुख्याध्यापक, युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण ☎ ५२८७७

 *या सृष्टीची लयलूट करू या दोन नेत्रांनी, हा आनंदोत्सव कोरून ठेवू आपल्या मनोमनी.*

काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन 'प्रबोधन'चे वाढतो आत्मविश्वास

**देवरुख** – **सौ. स्नेहा बोंद्रे,** बोंद्रेस क्लासेस, देवरुख, लि. रत्नागिरी
**कणकवली** – **अशोक एजन्सीज,** न्यूजपेपर एजन्सी, बाजार पेठ कणकवली, जि. सिंधुदुर्ग ☎ ३२३८३/३२०८३
**गोवा** – **१) श्री. दिलीप बेतकीकर,** डॉ. हेगडेवार विद्यालय, गोवेचीन हॉटेलसमोर, डॉ.दादावैद्य मार्ग, पणजी ☎२२८९४४
२) **श्री. सुहास मुळे,** अ १/ढ २ इंदिरा अपार्टमेंट, कोम्ब, मडगाव ☎ ७३६३२८
**बेळगाव** – **चि. संकल्प विनायक कुलकर्णी,** ४२ सराफ कॉलनी, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव

## ३. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र

**सातारा** –**१) श्री. सतीश कुलकर्णी,** प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं.३२७/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फे, सातारा. ☎ ५०५०४
**२) 'रिलेशन्स' द्वारा श्री. प्रकाश देवकुळे,** दुर्गा पेठ, आनंदवाडी, दत्ताजवळ, सातारा
**३) नगर वाचनालय,** राजवाड्यासमोर, सातारा.
**वाई** – **विज्ञान वाचनालय, द्वारा श्री. नागेश शंकर मोने,** 'भाग्योदय' ११२३, ब्राह्मणशाही, वाई, ☎ ७०७६६
**कराड** – **श्री. दत्तात्रय ना.कुलकर्णी** (नावडीकर) ४५६डी, सोमवार पेठ, पंताचा कोट, नावडीकर वाडा, कराड ☎२५०५
**फलटण** – **डॉ. ए. एच. कुलकर्णी** 'सुमन' संजीवराजेनगर, गिरवीरोड, फलटण ☎ २३९६०
**इस्लामपूर** – **श्रीमती सविता सदानंद देसाई,** रुबी एंटरप्रायजेस, कचेरी रोड, इस्लामपूर ☎ २२४२२
**विटा** – **सौ. सुनिता तु. देशचौगुले,** 'आशीर्वाद' हॉस्पिटल, विटा ☎ ७२००८
**मिरज** – **श्री. प्रभाकर पोक्षे,** अक्षय प्रोव्हिजन स्टोअर्स, लोकमान्य सोसा., मिरज कॉलेजजवळ, मिरज ☎ २२३६७२
**सांगली** – **१) श्री. शैलेंद्र केळकर,** ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली. ☎ ३३१३८२
**२) चि. शंतनु गोरक्षनाथ इनामदार,** व्ही.-११, वंदन अपार्टमेंट, चिनार हॉटेलजवळ, नेमिनाथनगर, विश्रामबाग, सांगली ३२४२०२
**इचलकरंजी** – **श्री विनायक गद्रे,** वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंजी ☎ ४२४००८
**कोल्हापूर** – **डॉ. शुभांगी कुलकर्णी,** आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ ५२१५३४
**शिराळा** – **श्री. रविंद्र गोपिनाथ गुळवणी,** द्वारा:सांगली अर्बन को.ऑ.बँक, शाखा शिराळा, जि. कोल्हापूर ☎ ७२१०३
**सोलापूर** – **ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर,** डफरीन चौक, होम ग्राऊंड जवळ, सोलापूर ☎ ६२५७८२
**बार्शी** – **श्री. रा. भ. गौरकर,** अध्यापक कॉलनी, बार्शी ☎ २२५०१
**कुर्डुवाडी** – **डॉ. संतोष काकडे,** माधव स्मृति रुग्णालय, कुर्डुवाडी ☎ २४६०२
**पंढरपूर** – **श्री. सुनिल यरगट्टीकर,** द. ह. कवठेकर प्रशाला, वीर सावरकर पथ, पंढरपूर ☎ २३२०१

## ४. उत्तर महाराष्ट्र

**नाशिक** – **१)सौ. साधना गाडगीळ,** रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक ☎ ५७४८३०
**२) कु. गौरी दिगंबर पाडळीकर,** ४ नव यशोधन अपार्ट. पाटील लेन नं. १ कॉलेज रोड, नाशिका ☎ ३११७५१
**नाशिक रोड** – **सौ. पष्पा गवांदे,** 'सायंतारा' गणेश सोसा., शिखरेवाडी, नाशिक रोड ६४९००
**मालेगाव** – **श्री. भरत कलंत्री,** कलंत्री ब्रदर्स, द्वारा राहूल ट्रान्सपोर्ट, जनता लॉनजवळ, मॅम्को बँकेसमोर, मालेबाव ☎ ४३०१६३/४३१००५
**धुळे** – **सौ. उषा पाठक,** धुळे अर्बन बँक, गरूडबाग, धुळे.
**नंदूरबार** – **श्री. विलास पांडुरंग जोशी,** जनक आभूषणसमोर, श्रीकृष्ण बिल्डिंग, ३रा मजला, नंदूरबार
**साक्री** – **श्री. चंद्रकांत देविदास पंचभाई,** मु. पो. कासारे, ता. साक्री ☎ ७४३७५
**शहादा** – **प्रा. सी. एम्. चौधरी,** कमलताई हौ. सो. मोहिदातर्फे हवेली, ता. शहादा
**जळगाव** – **सौ. प्रीती पद्माकर कुलकर्णी,** द्वारा अभिनव विद्यालय,
**चोपडा** – **श्री. सुधाकर केंगे, विवेकानंदनगर,** यावल, रोड, चोपडा ☎ २०७९३
**चाळीसगाव** – **डॉ. रेखा शाम महाजन,** दिलीप गॅस एजन्सीजवळ, स्टेशनरोड, चाळीसगाव ☎ २२६११/२२४६२
**भुसावळ** – **श्री. पुष्कराज जगन्नाथ चौधरी,** 'अग्रवाल सदन' न्यू सातारा फाईल, भुसावळ

## ५. मराठवाडा

**औरंगाबाद** –**१) सौ. स्वाती पळसकर,** सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद. ☎ २३३२६

२) **सौ. अश्विनी प्र. देशमुख,** प्लॉट नं. १४४, सुशील, एन् ५, साऊथ, सिडको, सावरकरनगर, औरंगाबाद ☎४८४६३२

**लातूर – डॉ. अरूणा देवधर,** विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर ☎ ४३६१४

**परभणी –श्री. दिलीप राके,** 'पारस' नाथनगर, परभणी.

**सेलू – सौ. सुनंदा भोसकर,** ३३५ विद्यानगर, सेलू, लि. परभणी ☎ २२५१९

**आष्टी – डॉ. श्रीकांत द. कुलकर्णी,** मु. पो. आष्टी, जि. बीड ☎ ३२६५२

**माजलगाव – चि. श्रीपाद उदयराव कुलकर्णी,** मातृछाया, सन्मित्र कॉलनी, मालगाव, जि. बीड

**परळीवैजनाथ– श्री. एस. पी. तिळकरी,** तिळकरी निवास, विद्यानगर कॉलनी, परळीवैजनाथ, जि. बीड

**उस्मानाबाद – श्री. शेषाद्री व्यंकटेश डांगे,** स्नेहसंपदा, २७/५५८, समतानगर, धाराशिव ☎ २४०५९

## ६. विदर्भ विभाग

**अकोला – भूषण श्रीधर बापट,** द्वारा मिहीर उद्योग केंद्र, 'केशव अर्चना', गांधी चौक, अकोला ☎ ४४२१३८

**मंगरूळपरी –श्री.किशोर तानाजी आंबेकर,** हॉटेल पापा, एस.टी.स्टँडसमोर, मंगरूळपीर, जि. अकोला.

**हिरवा–मुरादे– श्री. अशोक आ. मुरादे,** मु. हिरवा (मुरादे), पो. पिंप्री (निपाणी) ता. नांदगाव, (जि. अमरावती)

## ७. नगर व पुणे ग्रामीण विभाग

**अहमदनगर – सौ. अश्विनी हेमंत गोखले,** 'वर्षा' समर्थ कॉलनी, सोनी मंगल कार्यालयाजवळ, अहमदनगर ☎ ३२९१४४

**श्रीगोंदा – श्री. रामकृष्ण यादवराव करडिले,** पंचायत समिती कर्मचारी क्वार्टर्स, कोर्टाजवळ, श्रीगोंदा, जि. अहमदनगर

**बारामती – चि. निलेश महाजन,** २ सिल्व्हर अपार्टमेंट, विजयनगर, भिगवण रस्ता, बारामती ☎ २३४६०

## ८. पुणे शहर विभाग

(सभासदांनी आपापल्या विभागातूनच दिवाळी अंक न्यावेत. ज्या विभागांसाठी वितरण केंद्रे नाहीत, त्यांनी मुख्य कार्यालयातून अंक न्यावेत.)

**मध्य पुणे – छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी, सदाशिव पेठ, **पुणे ३०** ☎ ४७७६९१

**कर्वे रोड – सौ. अभया दिलीप वाळिंबे,** १५अ/१० शेफाली, अश्वमेध हॉलशेजारी, एरंडवणा, **पुणे ४** ☎ ३४०८९१

**पौड रोड – सौ. सुषमा पावणस्कर,** १२ केशर अपार्ट., स.न.४६/२,बी–१, पौड रोड, जोशी हॉस्पिटल मागे, **पुणे ३८** ☎३३७७४३

**कर्वेनगर– सौ. मीना मंगेश काटदरे,** बी–१३/१४ 'आसावरी' सहवास सोसा. गल्ली नं.१ समोर, कर्वेनगर, **पुणे ५२** ☎ ३३९८१७

**कोथरुड – श्री. अरविंद करमरकर,** २/श्री आनंदश्री हौ. सोसा., हॅपी कॉलनी, लेन नं.३, कोथरूड **पुणे २९** ☎ ३४१७६६

**मॉडेल कॉलनी– श्री. रा.दि.बारटक्के,** १०८७अब/२ब शुभयोग, हरेश्वर मंदिरपथ, मॉडेल कॉलनी, **पुणे १६** ☎ ३५६१०९

**आनंदनगर– सौ. सुमिता तुळपुळे,** ८०७, 'विसावा' आनंदनगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, आनंददनगर पोस्टऑफिसजवळ, **पुणे ५१** ☎५३३४९३

**पद्मावती –चि. योगेश पाटणकर,** बी ६–११, गुरुराज सोसा., पद्मावती, पुणे–सातारा रोड, **पुणे ३७** ☎ ५२३९७३

**हडपसर – कु. निलिमा चौधरी,** बंटर स्कूल टीचर्स क्वॉर्टर्स, गाडीतळ, **पुणे २८**

**पिंपरी – सौ. वृषाली करंदीकर,** 'कर्मयोग' सोसा.बि.नं.बी/२, ब्लॉ.नं. ३०४, डॉ. बेक कंपनीसमोर, **पुणे १८**

**निगडी –ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय,** पेठ क्र. २५, निगडी, **पुणे ४४** . ☎ ७८४३८०

## ''महत्त्वाचे''

(सावंतवाडी, जालना, नांदेड, बीड, अमरावती, नागपूर येथे पुरेशी सभासदसंख्या असूनही स्वयंसेवीवृत्तीने वितरण केंद्राची जबाबदारी कोणीही न स्वीकारल्याने तेथील सभासदांना अंक पोस्टाने पाठविले जातील. त्यामुळे अंक न मिळाल्यास दुसरा अंक पाठविला जाणार नाही. अजूनही कोणी याची जबाबदारी घेणार असल्यास त्यांनी १० ऑक्टो. पर्यंत तातडीने पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्यानुसार वितरण केंद्र सुरू झाल्यास संबंधित सभासदांना पत्राने कळविले जाईल, पत्र न आल्यास अंक पोस्टाने येईल असे समजावे.)

---

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ९ आश्विन शके १९१९, १ ऑक्टोबर १९९७ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

# मुलामुलींसाठी तंबूतील शिबिर व गिरिभ्रमण

## दीपावलीची सुट्टी अनुभवसमृद्ध करण्याची सुवर्णसंधी !

- डोंगरदऱ्यांमध्ये, स्वच्छ, मोकळ्या वातावरणात स्वच्छंदीपणे विहरायचं....
- सह्याद्रीच्या कुशीत निसर्गनिरीक्षणातून पक्षी-वनस्पती-नक्षत्रे यांची ओळख करून घ्यायची...
- मराठमोळा, रांगडा मुलुख उघड्या डोळ्यांनी बघायचा, त्यांच्यातच मिसळून जायचं...
- महाराष्ट्रभरातून आलेल्या प्रबोधकांबरोबर अन् पुण्यातील ताई-दादांबरोबर छानशी दोस्ती करायची...
- नेहमीच्या सुरक्षित अन् सुखवस्तू आयुष्यात न येणाऱ्या अडचणींना, प्रसंगांना सामोरं जायचं...
- भरपूर दमायचं अन् रमायचं देखील...
- अगदी हसतखेळत, गम्मतजम्मत करत, अनुभव अन् आत्मविश्वास मिळवायचा...

### हे सर्व अनुभवण्यासाठी या शिबिरात अवश्य सहभागी व्हा!

**कालावधी :** ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर १९९७
**वयोगट :** इ. ८ वी ते १२वी (मुला-मुलींसाठी स्वतंत्र शिबिरे होतील.) फक्त सभासदांसाठी
**स्थळ :** पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य परिसरात.
**शुल्क :** रु. ३५०/- (शिबिरकाळातील प्रवास-निवास-भोजन इ. सह)

प्रवेशसंख्या मर्यादित! लवकरात लवकर स्थानिक कार्यालयांमध्ये शुल्क भरून आपले नाव निश्चित करा. शिबिरासंबंधीचे अन्य तपशील स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत.

## ❖ दीपावली विशेषांक वितरणव्यवस्था ❖

दीपावली विशेषांक खात्रीशीर व वेळेत मिळावा यासाठी महाराष्ट्र-गोवा-बेळगाव येथे एकूण मिळून ७० हून अधिक ठिकाणी वितरणकेंद्रांची व्यवस्था केली आहे. या सर्वांचे पत्ते या अंकातील पान क्र. ३०-३१-३२ वर दिले आहेत. त्या त्या गावातील सभासदांनी या अंकातील पान २७-२८ वरील प्रश्नावली भरून ती वितरण-केंद्रावर द्यावी व आपला दीपावली विशेषांक २५ ऑक्टोबरनंतर घेऊन जावा.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत तेथेच फक्त अंक पोस्टाने पाठविले जातील. अंक पोस्टात गहाळ झाल्यास, न मिळाल्यास दुसरा अंक पाठविला जाणार नाही.

मागील अंकात नमूद केल्याप्रमाणे ज्यांनी वर्गणीव्यतिरिक्त दिवाळी अंकाच्या वितरणासाठी जादा २५ रुपये भरले असतील त्या सर्वांना रजिस्टर्ड पोस्टाने अंक पाठविला जाईल.

स्थानिक वितरणकेंद्र सांभाळणाऱ्या व्यक्ती स्वयंसेवी वृत्तीने हे कार्य करत असून, त्यांना आपण सर्वतोपरी सहकार्य करावे.

बहुतेक सर्व केंद्रांवर ज्ञान प्रबोधिनीची विविध शैक्षणिक प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध असतील. आपण ती अवश्य पाहून खरेदी करावीत व आपल्या संग्रही ठेवावीत.

**आपला अंक आपण वेळेत घेऊन जा व दिवाळीची सुट्टी अधिक आनंदात घालवा.**

यावर्षीच्या दिवाळी अंकाची खास वैशिष्ट्ये पान २ वर पाहा!

नोंदणी क्रमांक : PHM/22/VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128

## गाणे मुक्त मनांचे

हे गाणे मुक्त मनांचे, हे गाणे मुक्त स्वरांचे
उलगडते यातून सहजी जे स्पंदन युवहृदयींचे।।ध्रु.।।

स्वच्छंद खगासम वाटे, नभी उंच भरारी घ्यावी
मारता सागरी सूर, ती गूढे उकलून यावी
प्राणांत वसावे धैर्य, स्वप्नांस सत्य करण्याचे।।१।।

कोसळत्या धारांसंगे, सृजनाची सूक्ते गावी
मग इंद्रधनू रंगांची, अवनीवर उधळण व्हावी
येथेच निर्मू दे स्वर्ग, फळ तेच आम्हा श्रमण्याचे।।२।।

विद्या नि अविद्या दोन्ही एकाच गुंफू धाग्यात
कर्मातून उमजे ज्ञान, हे सूत्र असो मर्मात
तृषितांची मिटण्या आस, शिंपूया उदक यत्नांचे।।३।।

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030 ☎(०२१२) ४७७६९१, ४७८०९५
**कार्यालयाची वेळ :** स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत :** रु. १०/-
**वार्षिक वर्गणी :** रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर ९अश्विन , शके १९१९
१ ऑक्टोबर १९९७